दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१५७ | गुरूवार दि.२७ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### हा देश म्हणजे धर्मशाळा नाही; गृहमंत्री

नवी दिल्ली : ‘२०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे ध्येय मजबूत देशांतर्गत सुरक्षेच्या पायावरच अवलंबून आहे, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. दिल्लीत इंटेलिजन्स ब्युरोच्या राष्ट्रीय सुरक्षा रणनीती परिषदेच्या निरोप सत्रात बोलताना शहांनी घुसखोरी, दहशतवाद, मादक पदार्थांची तस्करी आणि सुरक्षा आव्हानांविरुद्ध आवश्यक पावले उचलण्याचे आवाहन केले. ‘देशांतर्गत सुरक्षा अधिक मजबूत केल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. पूर्वीच्या सरकारांनी अमली पदार्थांची तस्करी, नक्षलवाद आणि ईशान्येकडील असंतोष यासारख्या आव्हानांचा ते विकोपाला जाण्यापूर्वीच अंदाज लावला असता, तर आज देशाला अनेक दशकांच्या सुरक्षा आणि प्रशासकीय आव्हानांचा सामना करावा लागला नसता, असे शहा म्हणाले.

### १ सप्टेंबरपासून लातुरात हेल्मेट सक्ती

लातूर : लातूर जिल्ह्यात वाढत असलेल्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी प्रशासन व लातूर पोलीस विभागाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील दुचाकीस्वारांसाठी दि. १ सप्टेंबरपासून हेल्मेट वापरणे सक्तीचे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लातूर पोलीस विभागाने वर्षाच्या सुरुवातीपासूनच अपघातांमधील जीवितहानी कमी करण्यासाठी जनजागृती तसेच कायदेशीर कारवाईवर भर दिला आहे. लातूर जिल्हा पोलीस सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून सुमारे १,५०० पोलीस अधिकारी व अंमलदारांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले.

### पाकमध्ये १५ नवजात बाळांचा होरपळून मृत्यू

इस्लामाबाद : पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे बुधवारी सकाळी रुग्णालयाच्या स्त्रीरोग विभागात भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत तब्बल १५ नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस रुग्णालयात घडली.स्थानिक माध्यमांच्या माहितीनुसार, आग लागली तेव्हा रुग्णालयातील नवजात बालकांच्या कक्षात एकूण १६ बाळे होती. आग आणि धुरामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली. बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, या दुर्घटनेत केवळ एका नवजात बालकाला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले, तर १५ बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२५ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २९.५० क्विंटल | २,६११ | २,७८८ | २,६७४ |
| ज्वारी/हायब्रिड: १३२.०० क्विंटल | २,००१ | ३,३९१ | २,७४२ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १०.०० क्विंटल | ६,४०१ | ७,३९९ | ६,९०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १२.५० क्विंटल | २,६८१ | २,६८१ | २,६८१ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,९१० | ८,९१० | ८,९१० |
| सोयाबीन: १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभरा: १५.०० क्विंटल | ५,८३० | ५,८३० | ५,८३० |

# कांदा दरात तेजी, पण केंद्राच्या हस्तक्षेपाची शेतकऱ्यांना धास्ती

नाशिक । प्रतिनिधी

**यंदा पावसाला झालेला विलंब आणि त्यानंतर अनेक भागांत झालेल्या अतिवृष्टीमुळे कांदा लागवडीला उशीर झाला आहे. त्यातच काढणीला आलेल्या कांद्याचे बेमोसमी पाऊस व गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतातील तसेच चाळीत साठवलेला कांदा खराब होत असल्याने बाजारातील आवक घटली आहे. मध्य प्रदेशसह अन्य राज्यांतूनही कांद्याची आवक समाधानकारक नसल्याने सध्या कांद्याच्या दरात तेजी आली असून, पुढील दीड ते दोन महिने ही तेजी कायम राहण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.**

नाशिक जिल्ह्यात सध्या कांद्याला क्विंटलमागे सरासरी ३८०० ते ४१०० रुपये दर मिळत आहे. लासलगाव बाजार समितीत गेल्या आठवड्यापासून कांद्याचे दर साधारण ३७०० ते ४००० रुपयांच्या आसपास आहेत. सोमवारी सरासरी ४२५१ रुपये दर मिळाला, तर दुसऱ्या दिवशी तो सुमारे ४१०० रुपयांवर राहिला. किरकोळ बाजारात कांद्याचे दर ४० ते ५० रुपये किलोपर्यंत पोहोचले आहेत. यंदा कांदा काढणीच्या काळात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा मोठा फटका उत्पादकांना बसला. त्यामुळे शेतात तसेच चाळीत साठवलेला बराच कांदा सडला आहे. चाळीत शिल्लक असलेल्या कांद्याचे



वजनही कमी झाले असून, सडलेला कांदा वेगळा करून चांगला कांदा बाजारात आणण्यासाठी उत्पादकांची धडपड सुरू आहे. परिणामी बाजारात उपलब्ध होणाऱ्या चांगल्या कांद्याचे प्रमाणही कमी झाले आहे. सध्या काही प्रमाणात रब्बीचा कांदा उपलब्ध असला तरी तो बाजाराची गरज भागविण्यासाठी पुरेसा नाही. मध्य प्रदेशासह इतर राज्यांतून होणारी आवकही कमी आहे. कर्नाटकातही यंदा उत्पादन घटल्याने तेथील कांदा सप्टेंबरनंतरच मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे,

◀◀ पान २ वर

# नेपाळमध्ये जलप्रल; १०० जणांचा मृत्यू

## १०५ भारतीय पर्यटक बेपत्ता

काठमांडू । वृत्तसंस्था

**नेपाळमध्ये बुधवारी, २६ ऑगस्ट रोजी आलेल्या भीषण अचानक पुरामुळे मोठी हानी झाली आहे. तिबेटच्या दिशेने आलेल्या पाण्याच्या प्रचंड लोंढ्याने नेपाळमधील भोटेकोशी नदीचे पात्र फुगले आणि रसुवा, नुवाकोट व धादिंग परिसरातील अनेक भागांना मोठा फटका बसला. या दुर्घटनेत आतापर्यंत किमान १०० जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे, तर मोठ्या संख्येने नागरिक आणि पर्यटक बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे.**



नेपाळ पर्यटन मंडळाच्या माहितीनुसार, पुरामुळे प्रभावित भागात एकूण ३८४ प्रवासी बेपत्ता किंवा संपर्काबाहेर असल्याचे सांगण्यात आले आहे. यामध्ये २९१ विदेशी पर्यटक आणि ९३ नेपाळी नागरिकांचा समावेश आहे. विदेशी पर्यटकांमध्ये १०५ भारतीय नागरिक असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. मात्र, बचावकार्य अद्याप सुरू असल्याने बेपत्ता व्यक्तींची संख्या आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीचे अंतिम आकडे बदलण्याची शक्यता आहे.

◀◀ पान २ वर

# एमपीएससी पेपरफुटीचा आरोपी निघाला पुरस्कार विजेता शिक्षक

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पद भरती परीक्षा पेपरफुटी प्रकरणात धक्कादायक आणि चक्रावून टाकणारे खुलासे होत आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि नंदुरबार येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक अमृत पाटील यांना यापूर्वी राज्यस्तरीय ’उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारा’ने सन्मानित करण्यात आले होते. आपल्या मुलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांशी तब्बल १२ लाख रुपयांत पेपर खरेदीचा सौदा केला होता, ज्यातील ५ लाख रुपये त्यांनी अधिकाऱ्यांना दिले होते.

मात्र, २२ मार्च रोजी पार पडलेल्या या परीक्षेला बसलेल्या ४० हजार प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर या पेपरफुटीमुळे पाणी फेरलं आहे. ही पेपरफुटी एका वादग्रस्त ’लव्ह स्टोरी’ आणि ’ब्रेकअप’मुळे समोर आली. या संपूर्ण पेपरफुटी प्रकरणामागे एक

◀◀ पान २ वर

# आम्ही रेल्वे बंद करू विमानं उडू देणार नाही

## मुंबईतील आंदोलन बंदीवरुन भडकले मनोज जरांगे

मुंबई । प्रतिनिधी

२९ ऑगस्ट रोजी त्यांनी उपोषणाला बसण्याची घोषणा केली आहे. तसेच, गरज पडल्यास पुन्हा एकदा आपला मोर्चा मुंबईच्या दिशेने वळवणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, आझाद मैदानाव्यतिरिक्त दक्षिण मुंबईतील अन्य कोणत्याही ठिकाणी आंदोलन, धरणे किंवा मोर्चा काढण्यास मनाई केली आहे. आम्ही मुंबईत सगळीकडं आंदोलन करत असतो,



विरोध केला तर रेल्वे फिरू देणार नाही, तुमची विमानं उडू देणार नाही. आम्ही कुणाला मोजत नसतो आणि ऐकतही नसतो. असे म्हणत जरांगे पाटील यांनी सरकारला लक्ष्य केलं.

सरकार विरोधात जात आहे, लोकांनी यांना सत्तेवर बसवले, मराठ्यांनी यांना सत्तेवर बसवले. मात्र, त्याच गोरगरीब मराठ्यांना मुंबईत येण्यापासून रोखणं म्हणजे विरोध वाढण्याचे कारण फक्त सरकार आहे. कायदा तुमच्या हातात आम्ही देतो, सत्ता आम्ही तुमच्या हातात देतो आणि तुम्ही त्याचा गैरवापर करता. लोक यासाठी


◀◀ पान २ वर

# ४३ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## राजीव निले बीडचे मुख्यालय पोलिस उपअधीक्षक

मुंबई । प्रतिनिधी

पोलिस आस्थापना मंडळ क्रमांक १ च्या शिफारशीनुसार राज्यातील ४३ पोलिस अधिका–यांच्या बदली आणि पदस्थापनेचे आदेश जारी करण्यात आले. प्रशासकीय कारणास्तव या अधिका–यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, बीड, गडचिरोली, रायगड,



नाशिक, अमरावती यांसह विविध ठिकाणच्या अधिका–यांचा यात समावेश आहे.तर राजीव धुराजी निले यांची सातारा येथील उपविभागीय पोलिस अधिकारी पदावरून बीड येथे पोलिस उपअधीक्षक, मुख्यालय म्हणून बदली करण्यात आली.

यात काही अधिका–यांना पदोन्नतीनंतर नवीन जबाबदा–या देण्यात आल्या आहेत तर काही अधिका–यांची प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली. स्वप्नील राजाराम

◀◀ पान २ वर

# अखेर औषध निरीक्षक भरती प्रक्रिया रद्द

## परीक्षेत गैरप्रकार, एमपीएससीने घेतला मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट–ब या पदासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द केली. या परीक्षेची प्रश्नपत्रिका आधीच सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर लीक झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर मुंबई पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने केलेल्या प्राथमिक चौकशीच्या आधारे आयोगाने आज हा निर्णय घेतला. झालेली परीक्षाच रद्द झाल्याने यासाठी पुन्हा फेरपरीक्षा घेतली जाऊ शकते.

परीक्षेत गैरप्रकार झाल्याचे निष्पन्न झाल्याने आणि एकाच उमेदवाराला या परीक्षेचा प्रश्न संच मिळाला आणि त्याचा लाभ घेतल्याचे उघड झाले. या मुद्यावरून विद्यार्थ्यांनी लढा दिला. त्याला मोठे यश मिळाले. या प्रकरणी सर्वप्रथम आमदार रोहित पवार यांनी पेपरफुटीचा आरोप केला होता. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अन्न व औषध प्रशासन–औषध निरीक्षक, गट ब भरती प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने फेरपरीक्षा आयोजित

◀◀ पान २ वर

# मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात शासन सकारात्मक–विखे पाटील

मुंबई । प्रतिनिधी

राज्य शासन मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात सकारात्मक असून सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडील मराठा समाजाच्या संबंधी प्रलंबित विषयांवर तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री तथा मराठा



आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

मराठा समाजाशी संबंधित विविध विषयांबाबत आढावा बैठक उपसमितीचे अध्यक्ष विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीस पर्यटन मंत्री शंभुराज देसाई,

◀◀ पान २ वर

# भुजबळांची ‘तटस्थता’ की सरकारची रणनीती?

## मराठा–ओबीसी आंदोलनापूर्वी राजकारणात नवा पेच

मुंबई । प्रतिनिधी

**मराठा विरुद्ध ओबीसी आरक्षण संघर्षात आतापर्यंत सरकारची ’ढाल’ बनून उभे राहिलेले ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांच्या अलीकडील वक्तव्याने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगवली आहे. १ सप्टेंबर रोजी प्रा. लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत ओबीसी हक्कांसाठी भव्य मोर्चा आणि आंदोलनाची तयारी सुरू असतानाच, भुजबळांच्या बदललेल्या भूमिकेमुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. हे वक्तव्य सरकारवरील दबाव कमी करण्यासाठी आखलेल्या रणनीतीचा भाग आहे की भुजबळांनी स्वतःहून घेतलेली सावध पवित्रा म्हणायचे.**

मराठा आरक्षणाच्या मागणीवरून आंदोलक सातत्याने सरकारवर थेट तोफा डागत होते. त्या वेळी ओबीसी समाजाचे नेतृत्व म्हणून छगन भुजबळ आणि प्रा. लक्ष्मण हाके यांनी समोर येत आक्रमक भूमिका घेतली, ज्यामुळे सरकारच्या अंगावर येणारा रोष बऱ्याच अंशी ओबीसी विरुद्ध मराठा अशा सामाजिक संघर्षात विभागला गेला. मात्र, सत्ताधारी पक्षातील अंतर्गत राजकारण आणि निर्णय प्रक्रियेतील मर्यादा पाहता, ‘सरकारवर होणारे हल्ले आपण स्वतःवर का ओढवून घ्यायचे?’



या विचारातून भुजबळांनी अंग काढून घेतल्याची चर्चा आहे. प्रा. लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली १ सप्टेंबरला मुंबईत धडकणाऱ्या मोर्चाने महायुती सरकारपुढील अडचणी वाढण्याची चिन्हे आहेत. हा मोर्चा तीव्र झाल्यास सरकार थेट ओबीसी समाजाच्या रोषाला सामोरे जाण्याची भीती आहे. अशा स्थितीत, ओबीसी नेतृत्वाने काहीसे मवाळ किंवा तटस्थ विधान केल्यास आंदोलनाची धार काही प्रमाणात कमी करता येईल आणि सरकारला चर्चांसाठी वेळ मिळेल, असा एक राजकीय तर्क लावला जात आहे.दुसरीकडे, सत्तेत बसलेले ओबीसी नेते समाजाच्या हक्कांचे रक्षण करण्यात अपयशी ठरत असल्याचा सूर जमिनीवर उमटू लागला आहे. हा रोष थेट सरकारवर न उलटता नियंत्रणात राहावा, यासाठी भुजबळांच्या वक्तव्याचा वापर एका

◀◀ पान २ वर

# पत्नी ही पतीची मालमत्ता नाही; न्यायालय

बंगळुरू । वृत्तसंस्था

**पत्नी ही घरकामासाठी किंवा सासू–सास–यांची सेवा करण्यासाठी ठेवलेली कर्मचारी अथवा पतीची खासगी मालमत्ता नाही, असे कठोर निरीक्षण नोंदवत कर्नाटक उच्च न्यायालयाने पतीची याचिका फेटाळली. लग्न म्हणजे पत्नीच्या स्वातंत्र्यावर नियंत्रण मिळवण्याचे लायसन्स नाही, असे न्यायाधीशांनी स्पष्ट केले.**

पुरुषांनीही घरात कामे करावी. न्यायमूर्ती डॉ. चिलकूर सुमालता यांच्या खंडपीठाने म्हटले की, केवळ लिंगाच्या आधारावर एखाद्या महिलेचे स्वातंत्र्य मर्यादित करणे हे समानतेच्या घटनात्मक तत्त्वांच्या आणि मानवी प्रतिष्ठेच्या विरोधात आहे.पत्नी ही घरकामासाठी किंवा सासू–सास–यांची सेवा करण्यासाठी ठेवलेली कर्मचारी किंवा पतीची खासगी मालमत्ता नाही. लग्न म्हणजे पत्नीची वैयक्तिक ओळख, स्वातंत्र्य किंवा तिच्या आवडीनिवडींवर नियंत्रण मिळवण्याचे

◀◀ पान २ वर

अग्रलेख

# इथेनॉल धोरणापासून देशाच्या प्रत्येक सुधारणेपर्यंतनियोजन कुठे आहे, मोदीजी?

सरकारची सुधारणा म्हणजे केवळ घोषणा, लक्ष्ये आणि टाळ्यांचा कडकडाट एवढीच आहे का? देश चालवताना एखादे धोरण जाहीर करणे सोपे असते; पण त्याचे परिणाम, बाजारातील बदल, उद्योगांची गुंतवणूक, शेतकऱ्यांचे हित आणि देशाची अन्नसुरक्षा यांचा एकत्रित विचार करून दीर्घकालीन आराखडा तयार करणे ही खरी कसोटी असते. इथेनॉल धोरणाने मात्र या कसोटीत केंद्र सरकारच्या नियोजनाचा अभाव पुन्हा एकदा उघड केला आहे. निवडणुकीत यंत्रणा प्रभावीपणे चालवणाऱ्या सरकारकडे देशाच्या सुधारणांसाठी अशीच सक्षम 'प्लॅनिंग मशिनरी' आहे का, हा प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विचारण्याची वेळ आली आहे.

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट वाढवताना सरकारने साखर उद्योगाला मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिले. खासगी आणि सहकारी साखर कारखान्यांनी कोट्यवधी रुपये खर्चून डिस्टिलरी आणि इथेनॉल प्रकल्प उभारले. सरकारने दिलेल्या धोरणात्मक संकेतांवर विश्वास ठेवून उद्योगांनी क्षमता वाढवली. मग साखरेचे उत्पादन घटले, दर वाढले आणि देशांतर्गत उपलब्धता कमी झाली, तेव्हा इथेनॉल निर्मितीसाठी साखरेचा वापर करण्यावर निर्बंध आले. प्रश्न असा आहे की, धोरण ठरवताना या परिस्थितीचा अंदाज सरकारला का आला नाही? एकीकडे पेट्रोल आयात कमी करण्यासाठी इथेनॉलचा वापर वाढवायचा आणि दुसरीकडे त्याच इथेनॉलसाठी ऊस, मका आणि धान्य वळवायचे; परिणामी अन्नधान्य, डाळी आणि खाद्यतेलाच्या आयातीची गरज निर्माण झाली, तर या धोरणाला दूरदृष्टीचे धोरण कसे म्हणायचे? पेट्रोल आयातीवर वाचवलेले परकीय चलन आणि अन्नपदार्थांच्या आयातीवर खर्च होणारे परकीय चलन यांचा सरकारने कधी एकत्रित हिशेब मांडला आहे का? याहून गंभीर बाब म्हणजे इथेनॉल वापर केवळ इंधनापुरता मर्यादित नाही. रासायनिक, औषधनिर्मिती आणि अन्य औद्योगिक क्षेत्रांनाही त्याची गरज असते. इंधनासाठी मोठ्या प्रमाणावर इथेनॉल वळवल्यानंतर देशांतर्गत उद्योगांना महागडे इथेनॉल आयात करण्याची वेळ आली, तर मग आत्मनिर्भरतेच्या घोषणेचे काय झाले? एका क्षेत्राला प्रोत्साहन देताना दुसऱ्या क्षेत्राची कोंडी करणे म्हणजे सुधारणा नव्हे; ती धोरणांची विसंगती आहे. आज साखरेचे दर वाढले आहेत. कारखान्यांनी इथेनॉल उत्पादनाची क्षमता उभी केली आहे. मात्र त्या तुलनेत खरेदी दर आणि कोट्याचे नियोजन स्पष्ट नसेल, तर उद्योगांची गुंतवणूक अडकणारच. ऑइल मार्केटिंग कंपन्यांकडून इथेनॉल खरेदीचे कोटे कसे ठरतात, त्यात पारदर्शकता किती आहे, याचे उत्तर सरकारने द्यायला हवे. आणि हा प्रश्न केवळ इथेनॉलपुरता नाही. कृषी सुधारणा असोत, शिक्षण असो, रोजगार असो, आरोग्य व्यवस्था असो, ऊर्जा धोरण असो किंवा औद्योगिक धोरणघोषणा आधी आणि परिणामांचा अभ्यास नंतर, अशी पद्धत देशाला किती काळ परवडणार? प्रत्येक सुधारणा निवडणुकीच्या घोषणापत्रातील 'उपलब्धी' दाखवण्यासाठी नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी स्थिर व्यवस्था निर्माण करण्यासाठी असते. मोदीजी, देशाला लक्ष्यांची संख्या नको; लक्ष्य गाठण्यासाठीची शाश्वत यंत्रणा हवी आहे. निवडणुका जिंकण्यासाठी बूथनिहाय नियोजन करता येते, प्रचाराचे सूक्ष्म व्यवस्थापन करता येते, मग देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी, अन्नसुरक्षेसाठी आणि उद्योगांसाठी पाच-दहा वर्षांचे समन्वित नियोजन का करता येत नाही? 'सुधारणा' हा शब्द आकर्षक आहे; पण सुधारणा म्हणजे धरसोड नव्हे. आज प्रोत्साहन, उद्या निर्बंध आणि परवा पुन्हा प्रोत्साहनया चक्रातून उद्योग, शेतकरी आणि ग्राहक यांना बाहेर काढणे हीच खरी परीक्षा आहे. देशाला घोषणाबाजीची नव्हे, तर दूरदृष्टीची सरकारची 'प्लॅनिंग मशिनरी' हवी आहे. इथेनॉलने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. आता उत्तर देण्याची जबाबदारी सरकारची आहे.

# शारीरिक आणि मानसिक कमजोरीकडे दुर्लक्ष करू नका-डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

**आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत पुरुष आणि महिलांमध्ये सतत थकवा, शरीरात अशक्तपणा, उत्साहाचा अभाव, चिडचिड, मानसिक ताण आणि झोपेच्या समस्या वाढताना दिसत आहेत. या समस्यांचा परिणाम आत्मविश्वासासह वैवाहिक जीवनावरही होऊ शकतो. त्यामुळे शारीरिक व मानसिक कमजोरीकडे दुर्लक्ष न करता वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे, असे मत मानसोपचार तज्ज्ञ डॉ. जगदीश श्रीराम टेकाळे यांनी व्यक्त केले.**

पुरुषांमध्ये शारीरातील कमजोरी, थकवा, कामाचा ताण, आत्मविश्वास कमी होणे, स्टॅमिना कमी जाणवणे तसेच वैवाहिक जीवनातील असमाधान अशा तक्रारी दिसतात. महिलांमध्ये सतत थकवा, हार्मोनल बदल, चिडचिड, मानसिक ताण, अशक्तपणा, झोपेचा त्रास आणि वैवाहिक जीवनातील निरुत्साह जाणवू शकतो. चुकीचा आहार, व्यायामाचा अभाव, मानसिक ताण, अपुरी झोप, मधुमेह किंवा अन्य आजार, धूम्रपान-मद्यपान तसेच वाढते वय आणि हार्मोनल बदल ही यामागील प्रमुख कारणे असू शकतात. दररोज किमान ३० मिनिटे चालणे किंवा व्यायाम करणे, पौष्टिक आहार घेणे, पुरेशी



झोप घेणे, ताण कमी ठेवणे आणि मोबाईलचा अतिरेक टाळणे आवश्यक आहे. समस्या कायम राहिल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही डॉ. टेकाळे यांनी सांगितले. डॉ. जगदीश श्रीराम टेकाळे हे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ज्ञ (गोल्ड मेडलिस्ट), न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ज्ञ व सेक्सोलॉजिस्ट आहेत. ते महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरातील साई (गावते कॉम्प्लेक्स, डी.पी. रोड, डॉक्टर लाईन, बसस्थानकाच्या पाठीमागे) येथे उपलब्ध असतात.

# पाडळी येथील १० वर्षांचा शेतीचा वाद सामोपचाराने मिटला

## बीड जिल्हा पोलीस दलाच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक

बीड -शिरूर कासार । प्रतिनिधी

**बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या 'पोलीस आपल्या बांधावर' या अभिनव उपक्रमातून शिरूर कासार तालुक्यातील पाडळी येथील मागील ८ ते १० वर्षांपासून धुमसत असलेला शेती आणि कौटुंबिक वाद अत्यंत सामंजस्याने मिटवण्यात यश आले आहे. सासऱ्याने आपल्या नातवाच्या नावे अडीच एकर शेतजमीन देण्याचे मान्य केल्याने या प्रदीर्घ वादावर कायमचा पडदा पडला आहे.**



मौजे पाडळी (ता. शिरूर कासार) येथील एका कुटुंबात पतीच्या निधनानंतर शेतीचा हक्क आणि उपजीविकेच्या प्रश्नावरून संबंधित महिला व तिचे सासरे यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून तीव्र वाद सुरू होता. या वादातून मारहाण, शेतात प्रवेश नाकारणे आणि उदरनिर्वाहासाठी जमीन न देणे अशा स्वरूपाच्या तक्रारी वेळोवेळी पोलीस ठाण्यात दाखल झाल्या होत्या. त्यामुळे दोन्ही बाजूंमध्ये सातत्याने तणावाचे वातावरण निर्माण होत होते. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस अधिकारी व अंमलदारांनी केवळ कागदोपत्री तक्रारी न हाताळता

> **“ वाद वाढण्यापूर्वीच पोलिसांशी संपर्क साधा: पोलीस अधीक्षक**
>
> ''ग्रामीण भागात जमिनीचे वाद, बांध, पाणी किंवा शेतरस्त्यांवरून निर्माण होणाऱ्या वादांचे रूपांतर गंभीर गुन्ह्यांत होण्यापूर्वीच ते सामोपचाराने सोडवण्यासाठी 'पोलीस आपल्या बांधावर' हा उपक्रम प्रभावी ठरत आहे. नागरिकांनी किंवा शेतकऱ्यांनी कोणताही तणाव निर्माण झाल्यास कायदा हातात न घेता थेट पोलिसांशी संपर्क साधावा व या उपक्रमाचा लाभ घ्यावा.
>
> **-बीड जिल्हा पोलीस दल**

प्रत्यक्ष पाडळी गावातील संबंधित शेताच्या बांधावर जाऊन दोन्ही पक्षांशी थेट संवाद साधला. गावातील प्रतिष्ठित नागरिक व नातेवाईकांना सोबत घेऊन दोन्ही बाजूंची समजूत काढण्यात आली. पोलिसांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश येऊन, सासऱ्याने आपल्या नातवाच्या नावावर अडीच एकर जमीन देण्यास संमती दर्शवली. या निर्णयामुळे दोन्ही पक्षांमधील कटुता संपून वाद कायमचा संपुष्टात आला.

# माजलगाव येथे श्रावण मासानिमित्त श्रीरामचरित्र मानसचे नवान्ह पारायण

माजलगाव । प्रतिनिधी

**माजलगाव येथील राजस्थानी मंगल कार्यालयात माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने श्रावण मासानिमित्त श्रीरामचरित्र मानसचे नवान्ह पारायण भक्तिमय वातावरणात आयोजित करण्यात आला होता.**

माजलगावच्या विख्यात गायिका श्रीमती छाया राजेंद्र शर्मा यांच्या सुमधुर वाणीत पारायणाचे संगीतमय वाचन होत आहे. श्रीमती शर्मा या माजलगावचे स्वर्गीय बाबूलाल शर्मा यांच्या सूनबाई आहेत. आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्राची विशेष आवड असलेल्या श्रीमती शर्मा यांनी आपल्या व्यस्त दैनंदिनीतून वेळ काढून माहेश्वरी महिला मंडळाच्या आग्रहास मान देत नवान्ह पारायणामध्ये



निःस्वार्थ भावनेने संगीतमय सेवा केली या संगिता मधुर सुरांस सौ.सोनल घनश्याम मानधने व सौ.निता विक्रम मुंदडा यांनी साथ दिली या रामायण महाप्रसादाचे यजमान सौ.वर्षा बजाज, सौ.डॉ. निर्मला बजाज,सौ.अनुराधा बजाज आणि सौ.सारिका बजाज ह्या होत्या. पारायणादरम्यान प्रभू श्रीरामचंद्रांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे देखावे साकारण्यात येत आहेत. दररोजच्या प्रसंगानुसार लहान मुलांची आकर्षक वेशभूषा व सजावट करण्यात येत असून, त्यामुळे कार्यक्रमाला विशेष भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. श्रावण मासातील या धार्मिक उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यक्रमास विशेष सहकार्य माहेश्वरी महिला मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सदस्य व अध्यक्ष अलकनंदा मानधने सचिव अनिता मुंदडा वर्षा भक्कड सविता रांदड, अनिता लोहिया, लीला मानधने,वर्षा बजाज,सुरेखा जेथलिया,सुगना तेला, रत्नमाला इंदानी, किरण कासट यांनी केले.

# चंदनझिरा नवीन पोलीस ठाण्याच्या इमारतीचे आज भूमिपूजन

जालना । प्रतिनिधी

**चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या स्थापनेपासून सुरू असलेल्या प्रवासात एक महत्त्वपूर्ण टप्पा आता गाठला जात असून, पोलीस ठाण्यासाठी एमआयडीसी परिसरातील त्रिमूर्ती चौक येथे अत्याधुनिक व सुसज्ज नवीन इमारत उभारण्यात येणार आहे. सदर नवीन इमारतीचे भूमिपूजन आज २७ ऑगस्ट २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मान्यवराच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन करण्यात येणार आहे.**

चंदनझिरा पोलीस ठाण्याची स्थापना सन २०१४ मध्ये झाली. स्थापनेपासून आजपर्यंत पोलीस ठाण्याचे कामकाज आयटीआय कॉलेजच्या इमारतीमध्ये सुरू आहे. वाढती लोकसंख्या, वाढत्या गुन्हेगारीचा तपास, कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी, नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण तसेच पोलिसांच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजासाठी अधिक प्रशस्त व स्वतंत्र इमारतीची आवश्यकता सातत्याने भासत होती. ही गरज लक्षात घेऊन गृह विभाग तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांच्या माध्यमातून चंदनझिरा पोलीस ठाण्यासाठी नवीन इमारत मंजूर करण्यात आली आहे. शासनाकडून मंजूर निधीतून एमआयडीसी भागातील त्रिमूर्ती चौक येथे नवीन पोलीस ठाण्याची सुसज्ज इमारत उभारण्यात येणार आहे. नवीन इमारतीमुळे पोलीस अधिकारी व अंमलदारांना अधिक चांगल्या कार्यपरिसरात काम करता येणार असून, नागरिकांना देखील पोलीस ठाण्यात येताना अधिक सुसज्ज, सुरक्षित व नागरिकाभिमुख सुविधा उपलब्ध होणार आहेत. पोलीस ठाण्याच्या तपास, प्रशासकीय तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या कामकाजाला यामुळे निश्चितच अधिक गती मिळणार आहे. अशी माहिती पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु यांनी दिली आहे. सदर भूमिपूजन उद्घाटन श्री. कल्याण काळे खासदार जालना, श्री. अर्जुन खोतकर आमदार जालना, श्री. नारायण कुचे आमदार बदनापुर, श्री. विक्रम काळे आमदार मराठवाडा शिक्षक मदतरासंघ, श्री. सुहास शिरसाट विधान परिषद सदस्य छत्रपती संभाजीनगर-जालना, श्री. वीरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांची उपस्थिती लाभाणार आहे. सदर कार्यक्रमास उपस्थित राहणे करीता मा. पोलीस अधीक्षक जालना श्री. तेगबीरसिंह संधु, मा. अपर पोलीस अधीक्षक जालना डॉ. विक्रम साळी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून...

### कांदा दरात तेजी, पण केंद्राच्या

खरीपातील लाल कांदा बाजारात येण्यासाठी अद्याप सुमारे दोन महिन्यांचा कालावधी आहे. त्यामुळे आगामी काळात कांद्याचा पुरवठा आणि मागणी यातील तफावत कायम राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, कांद्याचे बाजारभाव सुधारू लागल्यानंतर केंद्र सरकारने बफर स्टॉकमधील कांदा बाजारात आणण्याचा निर्णय घेतल्याने उत्पादकांमध्ये नाराजी आहे. कांदा स्थिरीकरण निधीतून खरेदी केलेला कांदा शहरी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर आणल्यास बाजारातील दर कमी होऊन त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसण्याची भीती उत्पादक व्यक्त करीत आहेत. ''मोठ्या प्रतीक्षेनंतर कांद्याला काही प्रमाणात चांगला भाव मिळू लागला आहे. अशा वेळी बफर स्टॉकमधील कांदा बाजारात आणण्याचा निर्णय तातडीने मागे घ्यावा. देशांतर्गत बाजारावरील दबाव कमी करण्यासाठी योग्य वेळी उपाययोजना करण्याची गरज होती. आता दर सुधारत असताना सरकारचा हस्तक्षेप वाढविणे अन्यायकारक आहे,'' अशी भूमिका कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी घेतली आहे. सरकारने कांदा बाजारातील हस्तक्षेप कमी केला नाही, तर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशाराही उत्पादकांनी दिला आहे. त्यामुळे आगामी काळात कांद्याच्या दराबरोबरच केंद्राच्या धोरणाकडेही शेतकरी आणि बाजारपेठेचे लक्ष लागले आहे.

-----------

### एमपीएससी पेपरफुटीचा आरोपी

नाट्यमय लव्ह-हेट स्टोरी समोर आली आहे. अमृत पाटील यांनी कौटिल्य अकादमीच्या प्रवीण पाटील या दलालाच्या मदतीने २२ मार्चच्या परीक्षेच्या दोन दिवस आधी मुलगी ऋतुजा पाटील हिच्यासाठी प्रश्नपत्रिका मिळवली.ऋतुजाने प्रेमापोटी हा फुटलेला पेपर तिचा बॉयफ्रेंड आणि चाच अभ्यास करणारा विद्यार्थी गौरव पाटील उर्फ लोकेश याला दिला. मात्र निकाल जाहीर झाल्यावर ऋतुजा पाटील उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाली, मात्र तिचा प्रियकर गौरव पाटील अपात्र ठरला.ऋतुजा आता अधिकारी होईल आणि आपल्यापासून दूर निघून जाईल या भीतीपोटी, तसेच लग्नाला नकार दिल्याच्या रागातून गौरवने थेट एमपीएससीकडे पेपरफुटीची तक्रार केली.तक्रार दाखल केल्यानंतर गौरवने दुसऱ्याच दिवशी 'मी अपात्र ठरल्याने मुद्दाम बनाव रचला होता' असा ई-मेल करून तक्रार मागे घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता आणि चौकशीची चक्रे फिरली होती. पोलिसांनी या प्रकरणात तक्रारदार गौरव पाटील आणि शिक्षकासह एकूण ६ जणांना बेड्या ठोकल्या आहेत. तर ऋतुजा पाटील हिला अद्याप अटक करण्यात आली नसून पोलिसांनी तिला कायदेशीर नोटीस पाठवली आहे.

--------------

### नेपाळमध्ये जलप्रल; १००

बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास भोटेकोशी नदीच्या पाण्याची पातळी अचानक वाढली. तिबेटच्या दिशेने आलेल्या पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे रसुवा जिल्ह्यातील टिमुरे आणि स्याफ्रुबेसी परिसरात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पाण्याच्या वेगवान प्रवाहामुळे वाहने, मालमत्ता, रस्ते आणि पूल वाहून गेले. काही नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.पूरग्रस्त भागातील जखमींना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी यासाठी नेपाळ लष्कराने वैद्यकीय पथके तैनात केली आहेत. २० तज्ज्ञ डॉक्टर, त्यात दोन सर्जनचा समावेश असून, त्यांना त्रिशूली परिसरात तैनात करण्यात आले आहे. रस्ते वाहतुकीवर परिणाम झाल्याने काही वैद्यकीय सुविधा पर्यायी ठिकाणी उभारण्यात आल्या आहेत. लष्कराचे एमआय-१७ हेलिकॉप्टर वैद्यकीय पथकासह पूरग्रस्त भागाकडे रवाना करण्यात आले असून जखमींना आवश्यकतेनुसार हवाई मार्गाने उपचारासाठी हलवले जात आहे.१०५ भारतीय पर्यटक बेपत्ता असल्याच्या वृत्तामुळे भारतातही चिंता वाढली आहे. मात्र, हे सर्व पर्यटक मृत किंवा गंभीर संकटात असल्याचे मानण्याचे कारण नाही. सध्या अनेक भागांमध्ये मोबाईल नेटवर्क, रस्ते आणि इतर दळणवळण व्यवस्था विस्कळीत झाल्यामुळे अनेक जण संपर्काबाहेर असण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतीय नागरिकांच्या शोधासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी सुरू असलेल्या बचावकार्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**१४ हेलिकॉप्टरद्वारे बचावकार्य**

पुरामुळे अनेक रस्ते आणि दळणवळणाचे मार्ग बंद झाल्याने नेपाळ सरकारने हवाई बचावकार्याला प्राधान्य दिले आहे. नेपाळ लष्कराने १४ हेलिकॉप्टर बचाव आणि मदतकार्यासाठी तैनात केल्याची माहिती दिली आहे. यामध्ये ६ लष्करी आणि ८ खासगी हेलिकॉप्टर असल्याचे रेडिओ नेपाळने म्हटले आहे. आतापर्यंत किमान २५ जणांना सुरक्षित बाहेर काढले आहे.

-----------

### ४३ पोलिस अधिकाऱ्यांच्या

राठोड यांची ठाणे शहरातील सहायक पोलिस आयुक्त पदावरून गंगाखेड उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली तर राजेंद्र श्रीरंग शिरतोडे यांची गंगाखेड येथून ठाणे शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून बदली करण्यात आली. शिवाजी मारुती गायकवाड यांची गडचिरोली येथील पोलिस उपअधीक्षक पदावरून नागपूर शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. महेश कृष्णराव चव्हाण यांची भामरागड येथून नागपूर शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून बदली झाली.शुभदा शैलेश सांख्ये यांची नागपूर येथील अंमली पदार्थ टास्क फोर्समधून पुणे शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. सविता नरेंद्र शितोळे यांची नागपूर गुन्हे अन्वेषण विभागातून पुणे शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून बदली करण्यात आली. आसिफ अब्दुल अजीज शेख, विलास रामदास भोसले, चेतन बाळूभाई राठोड आणि सिमा विनायक मेर यांची अनुक्रमे गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर आणि बीड येथून मुंबई शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. राजीव धुराजी निले यांची सातारा येथील उपविभागीय पोलिस अधिकारी पदावरून बीड येथे पोलिस उपअधीक्षक, मुख्यालय म्हणून बदली करण्यात आली. राजू संभाजी सोनावणे यांची महाराष्ट्र सायबरमधून श्रीवर्धन, रायगड येथे उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.डॉ. निलेश पालवे यांची गंगापूर, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथून महाराष्ट्र सायबरमध्ये पोलिस उपअधीक्षक म्हणून बदली करण्यात आली. मंगेश सखाराम चाळके यांची मुंबई पोलिस नियंत्रण कक्षातून मुंबईचे सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. निनाद मधुकर सावंत यांची मुंबई शहरातील सहायक पोलिस आयुक्त पदावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मुंबई मुख्यालयात अपर पोलिस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. किरणकुमार चंद्रकांत सूर्यवंशी यांची कळवण उपविभागातून पुणे ग्रामीणच्या हवेली उपविभागीय पोलिस अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली.

-------------

### आम्ही रेल्वे बंद करू विमानं

तुम्हाला निवडून देतात की, आपण कसल्याही परिस्थितीत मुंबईला जरी गेलो, तरी आपलं सरकार तिथे आहे. आपले फडवणीस, आपले शिंदे, आपले दादा तिथे बसले आहेत. जे आपले म्हणून बसवले तेच मुंबईत येऊ नका म्हणतात, ही खूप मोठी दहशत झाली. ही सरकारची दादागिरी झाली, ही चालत नसते असेही जरांगे पाटील यांनी म्हटले. आमच्यापुढे दादागिरी करायची नाही. मग, आम्ही मुंबईत सगळीकडं आंदोलन करत असतो, विरोध केला तर रेल्वे फिरू देणार नाही, तुमची विमानं उडू देणार नाही. आम्ही कुणाला मोजत नसतो आणि ऐकतही नसतो. आम्ही कायद्याचा सन्मान करतो, आम्ही तुम्हाला परवानगीचा अर्ज दिला आहे. तुम्ही परवानगी द्या, नाहीतर नका देऊ. मी जात असतो, आमचं जायचं ठरल तर मी जाणार, रात्रंदिवस बसणार तुम्ही काय करणार ते आम्ही बघणार? तुम्ही मुंबईत कसे अडवतात हे पण बघतो, असे म्हणत मनोज जरांगेंनी मुंबईत आंदोलन करणारच अशी ठाम भूमिका मांडली. तुम्हाला मुंबईत अडथळा नको तर आमचे प्रश्न सोडवा, तुम्हाला प्रश्न सोडवायचे नाही तर सत्तेतही बसायचं नाही. मुंबईतील बांधवांनी समजून घ्यावे, आमच्यामुळे तुम्हाला त्रास होईल का? एखाद्या वेळेस नक्की होईल. मात्र, आम्हाला दहा-पंधरा दिवस सांभाळून घ्या, आम्ही तुमचेच आहोत, लोकाचे नाही. मुंबईत कोणीच सुखी नाही, आम्ही त्यांना नीट करायला यायला लागलो. जर ठरलं तर मुंबईत येणार, वर्षावरच येणार, तुमच्या बापाची पेंड आहे का? इकडे येऊ नको, तिकडे येऊ नको म्हणायला, असे म्हणत जरांगे पाटलांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच, अशा नोटीसा पाठवणं म्हणजे लोकांवर जुलूम नाही का? असा सवालही पाटलांनी विचारला.

----------------

### मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात

आमदार प्रसाद लाड, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.मंत्री विखे-पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक सोयीसुविधा व सवलती मराठा समाजातील विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याचा निर्णय घेतला असून सर्व विभागांनी याबाबत कार्यवाही सुरू केली आहे. यापुढे संबंधित विभागांनी ही प्रक्रिया अधिक गतिमान करून तातडीने क्षेत्रीय कार्यालयांना उचित निर्देश द्यावेत. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मराठा आरक्षण कक्षास सादर करावा. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेतील प्रलंबित निधी तातडीने देण्यात यावा. मराठा समाजाशी संबंधित विषयांचा मराठा आरक्षण कक्षाशी समन्वय ठेवण्यासाठी सर्व विभागांनी नोडल अधिकारी नियुक्त करावा, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिल्या.कुणबी जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र वितरणाच्या कामकाजाचा आढावा घेत प्रमाणपत्रे विहित मुदतीत देण्यात यावीत असे निर्देश देत विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी या कामकाजाचा आढावा घ्यावा असे मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत सांगितले.मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, अण्णासाहेब पाटील महामंडळाला शासनाने जुलैअखेरपर्यंत ४५० कोटी रुपये वितरीत केले असून हा निधी तातडीने लाभार्थ्यांना वितरीत करावा. सारथी संस्थेने मराठा समाजातील तरुण-तरुणी यांना रोजगारक्षम बनविणारे प्रशिक्षण उपक्रम राबवावेत. महावितरण भरती प्रक्रियेतील प्रतीक्षायादीतील उमेदवार यांना नियुक्ती देण्याच्या मागणीवर तपासून कार्यवाही करावी असे ते म्हणाले.

------------

### अखेर औषध निरीक्षक

करणार आहे. आयोगामार्फत औषध निरीक्षक, गट-ब, अन्न व औषध प्रशासन या संवर्गासाठी २९ जुलै २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. २२ मार्च २०२६ रोजीच्या चाळणी परीक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत आयोगास दिनांक २२ ते २६ जुलै, २०२६ या कालावधीत ई-मेलद्वारे काही उमेदवारांमार्फत तसेच लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झाल्या. परीक्षा सुरू होण्यापूर्वी म्हणजेच दि. २० मार्च २०२६ रोजी काही उमेदवारांना प्रश्नपत्रिका/प्रश्न मिळाले होते आणि ही प्रश्नपत्रिका सोशल मीडिया/इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसृत करण्यात आली होती, असे सदर तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले होते. यासंबंधीच्या निष्कर्षाआधारे आयोगाने औषध निरीक्षक, गट-ब या पदासाठीची भरती प्रक्रिया रद्द केली.

-------------

### पत्नी ही पतीची मालमत्ता

लायसन्स नाही, अशा कडक शब्दांत कर्नाटक हायकोर्टाने एका पतीची याचिका फेटाळून लावली.न्यायालयाने स्पष्ट केले की, घरातील कामे करणे किंवा सासू-सास-यांची सेवा करणे हे पत्नीचे ऐच्छिक काम आहे. आपल्या वृद्ध आई-वडिलांची काळजी घेण्याची प्राथमिक जबाबदारी ही त्यांच्या स्वत:च्या मुलांची आहे, सुनांची नाही. पत्नीवर तिच्या मनाविरुद्ध ताबा मिळवणे किंवा माहेरी जाण्यासाठी परवानगी सक्तीची करणे हे मानवी सन्मान आणि सामाजिक न्याय या संवैधानिक मूल्यांच्या विरोधात आहे, असे निरीक्षण यावेळी कोटाने नोंदविले.न्यायमूर्ती डॉ. चिलकूर सुमालता यांच्या खंडपीठाने म्हटले की, केवळ लिंगाच्या आधारावर एखाद्या महिलेचे स्वातंत्र्य मर्यादित करणे हे समानतेच्या घटनात्मक तत्त्वांच्या आणि मानवी प्रतिष्ठेच्या विरोधात आहे. घरातील कामे पुरुष आणि महिला दोघांनीही समानतेने वाटून घेतली पाहिजेत. सध्याची महागाई आणि जीवनमानाचा खर्च पाहता दरडोई १५० रुपये प्रतिदिन ही रक्कम अगदी तुटपुंजी आहे, असे स्पष्ट करत हायकोर्टाने पतीची याचिका फेटाळून लावत कौटुंबिक न्यायालयाची ९,००० ची मासिक पोटगी कायम ठेवली.

**पत्नीला काळी म्हणणे हा गुन्हा नाही**

पत्नीच्या काळ्या रंगावर, कमी बुद्धिमत्तेवर किंवा लाजाळू स्वभावावर टोमणे मारणे हे गुन्ह्याच्या कक्षेत येत नाही, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी करत झारखंड हायकोर्टाने पतीविरोधात सुरू असलेला गुन्हेगारी खटला रद्द केला. जस्टिस अनिल कुमार चौधरी यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, रंग-रूपावर टोमणे मारणे हे नैतिकदृष्ट्या चुकीचे असू शकते, परंतु हा गुन्हेगारी खटला चालवण्याचा आधार ठरू शकत नाही. ऑनलाईन मॅट्रिमोनियल साईटवरून झालेल्या या लग्नानंतर वाद निर्माण झाला होता, ज्यामध्ये पत्नीने असा आरोप केला होता की, पती तिच्या रंगावर आणि बोलण्याच्या पद्धतीवरून तिला सतत टोमणे मारत असे.

-------------

### भुजबळांची 'तटस्थता' की

'स्पीड ब्रेकर'सारखा केला जात असल्याचेही जाणकारांचे म्हणणे आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ओबीसी मतांची नाराजी महायुतीला परवडणारी नाही. त्यामुळे भुजबळांचे वक्तव्य ही सत्तेतील समन्वयाची खेळी आहे की त्यांची वैयक्तिक राजकीय नाराजी, याचे उत्तर १ सप्टेंबरच्या मुंबईतील आंदोलनाच्या तीव्रतेवरून आणि त्यानंतर सरकार घेणाऱ्या भूमिकेवरून स्पष्ट होईल. यामध्ये सरकारची दोन्ही कडून कोंडी होताना दिसत आहे एकीकडे मराठा आंदोलकासाठी स्पीड ब्रेकर असलेले ओबीसीच्या नेत्यांनी केलेले वक्तव्य म्हणजे तुम्ही सरकारचे भांडा तर दुसरीकडे ओबीसींचे दुसरे नेते लक्ष्मण हाके यांच्या आंदोलनाची तीव्रता कमी करणे हा देखील यामागचा उद्देश असू शकतो असे राजकीय जाणकारांचे मत आहे

---------------

cmyk

थोडक्यात

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....





नवगण राजुरी: ह. भ. प.अमृत महाराज जोशी यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना उपसरपंच भगवान बहीर समवेत अनिल बनकर, ज्ञानेश्वर बहीर, सुरेश बनकर, भाग्योदय बहीर, गणेश दहिवालेआदि.



पिंपळवंडी:- भारतीय स्वातंत्र्यदिनी अजित पवार मैदानात जि.प.कें.प्रा.शाळा सांस्कृतिक कार्यक्रमात भारत विविधतेतून एकात्मता,देशभक्ती, शिक्षण,कला व संस्कृतीचे गांवकऱ्यांना दर्शन घडले.कु.नित्या कुलकर्णी व मु.अ.शहाजी येवले, शिक्षक व विद्यार्थ्यांचे सरपंच शितल मोरे,उपसरपंच दादा पवार, राष्ट्रवादी युवा नेते ज्ञानेश्वर पवार, अशोक पवार,प्रशांत राऊत प्रेक्षकांनी कौतुक केले.

# कृष्णा नदीचे पूरपाणी मांजरा धरणात आणणार

## खा.सोनवणेंच्या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्याचा पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा गंभीर प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी सांगली व कोल्हापूर भागातील कृष्णा नदीचे अतिरिक्त पूरपाणी उजनी धरणात आणून तेथून मांजरा धरणात सोडण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे महत्त्वपूर्ण आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. खा.बजरंग सोनवणे यांनी दि.२६ रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन या योजनेसाठी पाठपुरावा केला होता. मुख्यमंत्र्यांच्या या आश्वासनामुळे बीड, लातूर आणि धाराशिव या दुष्काळग्रस्त जिल्ह्यांना मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.



मराठवाड्यातील दुष्काळी भागाला संजीवनी देणाऱ्या कृष्णा नदीच्या अतिरिक्त पूरपाण्याच्या मुद्द्यावर या भेटीत सविस्तर मंथन झाले. खा.बजरंग सोनवणे यांनी यापूर्वीही ही मागणी लावून धरली होती. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी, सांगली-कोल्हापूरच्या पूरपरिस्थितीवर नियंत्रण मिळवून ते पाणी उजनीमार्गे मांजरा धरणात वळवण्यासाठी आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक हालचाली सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. दरम्यान, या बैठकीत धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर रेल्वेमार्गाचा मुद्दाही लावून धरला. राज्य शासनाने आपल्या ५० टक्के निधीच्या सहभागाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला असल्याचे मुख्यमंत्र्यानी खा.सोनवणे यांना सांगितले. या प्रस्तावाला केंद्राची तातडीने मंजुरी मिळवून प्रत्यक्ष कामाला गती देण्याबाबत दोन्ही नेत्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली.

**चारा छावण्याची केली मागणी**

बीड जिल्ह्यातील भीषण टंचाई, शेतकरी आणि पशुपालकांची दुरवस्था लक्षात घेता जिल्ह्यात तात्काळ चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी खा.बजरंग सोनवणेंनी केली. पशुधनाच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने हालचाल करावी, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात संस्कृत सप्ताहाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

वर्तमान काळात संस्कृत भाषेची उपयोगीता या विषयावर बोलत असताना अखिल भारतीय निरपेक्ष कीर्तन सेवा संस्थेचे विश्वस्त व राष्ट्रीय संपर्क प्रमुख आदिनाथ शास्त्री कुंडकर म्हणाले की,विश्वाच्या रंगमंचावर अनेक देश आहेत त्यापैकी भारतदेश अनेक शतकांपासून या विश्वातील मानवजातीसाठी एक प्रेरणाकेंद्र म्हणून अस्तित्वात आहे.


ज्याप्रमाणे प्राणरहीत शरीर मृतशरीर असते, त्याप्रमाणे संस्कृती रहीत राष्ट्र मृतराष्ट्र असते,भारतीय संस्कृती चा आधार संसकृतभाषा आहे.ही भाषा लोकभाषा व्हावी या साठी संस्कृतभारतीचे संस्कृत सप्ताहाचे आयोजन.संस्कृत भाषेतच वैमानिक विद्या,नक्षत्र विद्या,रसायन शास्त्र,कृषिशास्त्र, नौकानिर्माण शास्त्र,लपलेली आहेत.ती अवगत करण्यासाठी संस्कृत अध्ययन.आवश्यक.संस्कृत भाषेचा सखोल अभ्यास केल्यावर शैक्षणिक क्षेत्रात, अध्यापक,प्राध्यापक,प्रोफेसर,वैद्यकीय क्षेत्रात बी.ए.एम.एस.एम.डी.पद,म्हणजे भारतातील अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि संशोधनासाठीच्या प्रमुख उच्च शिक्षण संस्थांमध्ये पाणिनि अष्टाध्यायीच्या मूळ सूत्रांचेसंगणकीकरण करण्यासाठी चे अभियंता पद,योगगुरू असणारे बाबा रामदेव यांच्याद्वारे संस्थापित पतंजली आयुर्वेद संस्थेत आयुर्वेदाचार्य पद,इत्यादि पदांवर कार्य करण्याची संधी मिळते या प्रसंगी प्रा.सुरेश नेळगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.परमेश्वर खेत्री यांनी अध्यक्षीय समारोप केला.या कार्यक्रमाचे आयोजक प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमासाठी प्रा.परळकर यांची उपस्थिती होती.विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

## ३७५ वाहन चालकांचा मोफत विमा उतरवून अ‍ॅड. अनंद काळे व प्रा सर्जेराव काळे यांचा वाढदिवस साजरा

वडवणी । प्रतिनिधी

सामाजिक व शैक्षणिक कार्यात सतत अग्रेसर असणारे अँड अनंद काळे यांनी आपला व वडील प्रा सर्जेराव काळे सर यांचा वाढदिवस व्यर्थ खर्च न करता तालुक्यातील ३७५ वाहन चालकांचा मोफत विमा वाटप करून आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा केल्याने जिल्ह्यात एक चर्चेचा विषय ठरला आहे.तालुक्यातील वाहन चालकांना आ प्रकाश दादा सोळंके व सभापती जयसिंग भैय्या सोळंके यांच्या हस्ते या मोफत विमा वाटप करण्यात आले.

. वाढदिवस म्हटले की डीजे,ढोल,ताशा,केक फटाक्यांच्या आतिषबाजीने साजरा केला जातो.परंतु व्यर्थ खर्चाला फाटा देत सामाजिक दायित्व निभावत सामाजिक कार्यकर्ते तालुक्यातील युवा नेते आनंद भैया काळे यांनी



कष्टकरी वाहनचालक बांधवांच्या सुरक्षिततेचा विचार करत त्यांच्या विम्याची व्यवस्था करून सामाजिक दायित्व जपणारा हा अभीष्टचिंतन सोहळा ठरला.तालुक्यातील ३७५ वाहनचालकांसाठी मोफत विमा पॉलिसी कवच देण्यात आले.त्याची मुदत दोन वर्षांची असून, अंशता मृत्यू आल्यास १० लख अथवा कायमचे अपंगत्व आल्यास ५ लाख रुपये मिळणार आहे.वाहनचालक हा त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार असतो.अपघातामुळे एखादी अघटित घटना घडल्यास कुटुंबावर आर्थिक संकट ओढवते आणि उपजीविकेचे साधनही बंद होते.त्यामुळे भविष्यातील संकटांचा सामना करण्यासाठी विमा संरक्षण असणे ही काळाची गरज आहे.संबंधित विमा कंपनीने काही घटना घडल्यास कसल्याही प्रकारच्या अटी शर्ती न लावता कुटुंबियांना दोन दिवसात विमा दिला जावा असेही आ प्रकाश दादा सोळुंके यांनी सांगितले.

साळींबा जलसिंचन उपसा योजना आ प्रकाश दादा सोळुंके यांनी मंजूर करून आणल्याबद्दल सात गावातील शेतकऱ्यांनी आ दादांचा सत्कार केला.कार्यक्रमास सभापती जयसिंग भैय्या सोळंके,प्रा सर्जेराव काळे,बीड नगरपालिकेचे उपाध्यक्ष विनोद मुळूक,नगराध्यक्ष शेषराव बापू जगताप, मा सभापती प्रशांत बापु सावंत,डॉ दत्तात्रय दुधाने,तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, कृ ऊ बाजार संचालक सचिन भैय्या लंगडे,सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष ऍड माधव काका शेंडगे,मा यु तालुका अध्यक्ष विश्वासराव आगे,संचालक रूक्मांगत शेंडगे,ऊ सरपंच गोविंद बादाडे मा सरपंच लखन महागोविंद,सरपंच अतुल झाटे,ग्रा प स विजय मोरे,ग्रा प स वैभव मस्के,महादेव अंभुरे,सुरेश बादाडे,कैलाश शिंदे, विजय काळे,

## पान ६ वरुन...

### शॉर्ट सर्किटमुळे दोन एकर

नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.वर्षभर कष्ट करून उभे केलेले दोन एकर ऊस पीक आगीत भस्मसात झाल्याने शेतकऱ्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन नुकसानभरपाई देण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून होत आहे.

### ऊस जळीतप्रश्नी आठ

भ्रमणध्वनी द्वारे पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत..

शेतकरी अश्रुबा लोखंडे यांच्या कुटुंबावर एम एस ई बी च्या निष्काळजीपणामुळे खूप मोठे संकट ओढावले असून त्यास एमएसईबी जबाबदार असल्याने एम एस सी बी ने शेतकऱ्याच्या झालेल्या नुकसानीची आठ लाख रुपये नुकसान भरपाई त्वरित द्यावी अशी मागणी प्रसिद्धी पत्रकाद्वारे भाई ड नारायण गोले पाटील यांनी केली आहे..

### बीड जिल्ह्यात दुष्काळ

शेतकऱ्यांवरील आर्थिक संकट लक्षात घेंऊन शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अन्यथा, १६ सप्टेंबर रोजी माजलगाव तहसील कार्यालयावर बैलगाड्या व जनावरांसह मोठ्या प्रमाणात मोर्चा काढण्यात येईल तसेच मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनी १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्र्यांना घेराव घालण्यात येईल, असा इशाराही थावरे यांनी दिला आहे. शेतकऱ्यांवरील आर्थिक संकट दूर करून त्यांना तातडीने मदत मिळावी आणि संभाव्य आत्महत्यांना आळा घालण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी केली आहे.

### पिंपळवंडीच्या उमैर शेखची

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, शिक्षक, पालक आणि उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. उमैर शेखच्या उल्लेखनीय यशाबद्दल बीड जिल्ह्यातील अधिकारी, पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मेहनत, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर उमैरने मिळविलेल्या या यशामुळे पिंपळवंडीच्या शैक्षणिक लौकिकात आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.

### नवनाथ बाबाच्या रूपाने

नाचतो आणि मनुष्य आयुष्यभर संसारी मोहमायेच्या तालावर नाचतो याच्यामध्ये आपले आयुष्य वाया घालवतो माणसाला जर आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर मनुष्याने साधुसंतांच्या संगतीमध्ये, हरिनामामध्ये, कीर्तनामध्ये नाचावं आणि हरिनाम हेच माणसाला वाचू शकते असे ह.भ.प. विशाल महाराज खोले यांनी अभंग विवेचनांमध्ये म्हटले. अभंग विवेचन करताना ह.भ.प. विशाल महाराज खोले यांनी संतश्रेष्ठ मीराबाई यांचे उदाहरण देऊन तसेच नृत्यसम्राज्ञ विठाबाई यांचे उदाहरण भाविक भक्तांना दिले व हरी नामाची महती सांगितली. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे प्रचंड भाविक भक्तांच्या गर्दीमध्ये हरिकीर्तन संपन्न झाले यावेळी टाळकरी, माळकरी, भजनी मंडळी, गायनाचार्य ,वादंगाचार्य, मृदंगाचार्य, यांच्यासह भाविक भक्तांच्या प्रचंड गर्दीमध्ये ह.भ.प.विशाल महाराज खोले यांचे कीर्तन संपन्न झाले.

### मंगळवारी झालेल्या

आगामी काळात पिकांची वाढ जोमाने होण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. पावसाने दिलेल्या या दिलास्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा समाधानाचे हास्य फुलले असून, आता पिकांसाठी अधूनमधून समाधानकारक पाऊस पडावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### केज शहरात ईद-ए-मिलादुन्नबी

केज शहराची ओळख असलेल्या गंगा-जमुना संस्कृतीचे दर्शन या जुलूसदरम्यान प्रकर्षाने पाहायला मिळाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्वधर्मसमभावाचे सुंदर दृश्य दिसून आले.हिंदू आणि मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन या उत्सवात सहभाग घेतला आणि एकमेकांना ईदच्या गोड शुभेच्छा दिल्या. जुलूसच्या मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांकडून मिरवणुकीत सहभागी झालेल्या बाळगोपाळांना व नागरिकांना फळे, खाऊ आणि पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.मानवता आणि शांतीचा संदेशप्रेम, शांती, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारे हजरत पैगंबर मोहम्मद यांचे संपूर्ण जीवन मानवजातीसाठी नेहमीच प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या विचारांचा व शिकवणीचा वसा पुढे चालवत केज शहरात हा सण अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पाळला गेला.या पवित्र ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने सर्व नागरिकांच्या जीवनात प्रेम, समाधान, सुख-शांती आणि समृद्धी नांदो, तसेच समाजातली एकता व सलोखा असाच अधिक दृढ होवो, हीच सदिच्छा! विशेष केज शहरात पोलीस प्रशासनाच्या चोख बंदोबस्ताखाली आणि दोन्ही समाजाच्या सहकार्याने हा सण अत्यंत शांततापूर्ण आणि आनंदात पार पडला.

## नगर परिषद हद्दीतील मोकाट जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील शहर आणि नगर परिषद हद्दीमध्ये मोकाट जनावरांचा सुळसुळाट झाला असून, यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. या मोकाट जनावरांचा नगर परिषद प्रशासनाने तातडीने बंदोबस्त करावा, अशी तीव्र मागणी संघर्ष मजुर क्रांती संघटने चे संस्थापक अध्यक्ष सादेक इब्राहिम शेख यांनी प्रशासनाकडे केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा हा प्रश्न त्वरित न सुटल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.मुख्य रस्त्यांवर वाहतूक कोंडीचा उच्छादगेल्या काही दिवसांपासून माजलगाव शहरातील मुख्य बाजारपेठ, मुख्य रस्ते आणि रहिवासी भागांमध्ये मोकाट जनावरांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. ही जनावरे रस्त्याच्या मध्यभागीच ठाण मांडून बसत असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक जाम होत आहे. यामुळे वाहनचालकांना आणि पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालणे अत्यंत कठीण झाले असून तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत आहे.शाळा सुटण्याच्या वेळी लहान मुले व वृद्धांच्या जिवाला धोकासर्वात बिकट



परिस्थिती शाळा सुटण्याच्या वेळेस निर्माण होते. दुपारच्या आणि संध्याकाळच्या सत्रात जेव्हा शाळा सुटतात, तेव्हा रस्त्यावर विद्यार्थ्यांची आणि पालकांची मोठी गर्दी असते. नेमक्या याच वेळी ही मोकाट जनावरे मुख्य रस्त्यांवर, शाळेसमोर आणि गल्लीबोळात गर्दीच्या ठिकाणी उच्छाद मांडतात. ही जनावरे थेट लहान मुलांच्या आणि वयस्कर नागरिकांच्या अंगावर धावून जात असल्यामुळे अनेक किरकोळ अपघात घडले आहेत. यामुळे पालकांमध्ये आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.कोंडवाडा सुरू करून कारवाई करण्याची मागणीशहरातील गल्लीबोळांपासून ते थेट मेन रोडपर्यंत पसरलेल्या या समस्येमुळे एखादी मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे माजलगाव नगर परिषद प्रशासनाने याकडे गांभीर्याने पहावे. शहरात तात्काळ मोकाट जनावरांना पकडण्याची मोहीम राबवून, बंद असलेला कोंडवाडा सुरू करावा. शाळकरी मुले, पादचारी आणि नागरिकांना या त्रासातून मुक्त करावे, अशी आग्रही मागणी संघर्ष मजुर क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## शेतकरी कर्जमाफीची केवळ आश्वासने नको, प्रत्यक्ष अंमलबजावणी करा!-भाई मुंजा पांचाळ

माजलगाव । प्रतिनिधी

या वर्षी माजलगाव तालुक्यात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी राहिल्याने तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातच गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. या दुहेरी संकटात सापडलेला माजलगावचा बळीराजा पूर्णपणे कोलमडला आहे. अशा गंभीर परिस्थितीत सरकारने केवळ कर्जमाफीची पोकळ आश्वासने न देता प्रत्यक्ष सरसकट कर्जमाफी लागू करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी कामगार पक्षाचे माजलगाव तालुका चिटणीस मुंजा पंचाळ यांच्या वतीने करण्यात येत आहे.



गेल्या वर्षी ऐन हातात आलेले पीक अतिवृष्टीने वाहून गेले, ज्याची भरपाई अद्याप अनेक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. त्यातून सावरण्याचा प्रयत्न करत असतानाच यंदा पावसाने दांडी मारल्यामुळे माजलगाव तालुक्यातील खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला आहे. विहिरी आणि कूपनलिका कोरड्या पडू लागल्याने पिकांसोबतच चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट बनला आहे. बँकांचे हप्ते आणि सावकारी कर्ज कसे फेडायचे, या चिंतेत शेतकरी वर्ग सापडला आहे. शासनाकडून वेळोवेळी केवळ घोषणांचा पाऊस पाडला जातो, मात्र माजलगावच्या शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडत नाही. आता आश्वासनांचा खेळ थांबवून सरकारने तालुक्यातील सर्व शेतीकर्जे त्वरित माफ करावीत. भाई मुंजा पांचाळ तालुका चिटणीस, शेतकरी कामगार पक्ष, माजलगाव यांच्या वतीने करण्यात येत आहे.

चाऱ्याची व पाण्याची सोय. तालुक्यात पशुधनासाठी छावण्या आणि नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत.

शासनाने माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या या रास्त मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ यांच्या नेतृत्वात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

# घरकुलाच्या लाभापासून दूर ठेवणाऱ्या दोषी अधिकाऱ्याचे निलंबन करा -ईश्वर तांबडे

## दहा दिवसांत कारवाई न केल्यास उपोषणाचा इशारा

वडवणी । प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना जाणीवपूर्वक त्रुटीत टाकून घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित ठेवल्याचा गंभीर आरोप भाजप युवा मोर्चाचे वडवणी तालुकाध्यक्ष ईश्वर भागवत तांबडे यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषी अभियंता विकास मुंडे यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी त्यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे २५ ऑगस्ट २०२६ रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

चिंचवण ग्रामपंचायतीअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र असलेल्या नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरले आहेत. अर्जदारांनी आवश्यक माहिती योग्य पद्धतीने भरूनही त्यांना योजनेच्या प्रक्रियेत जाणीवपूर्वक त्रुटीत टाकण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित लाभार्थी योजनेच्या लाभासाठी पात्र असतानाही विकास मुंडे यांनी स्वतःच्या आयडीमधून काही अर्ज जाणीवपूर्वक त्रुटीत टाकले तर काही अर्ज





डिलीट केल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकाराबाबत पुरावेही निवेदनासोबत जोडण्यात आल्याचे ईश्वर तांबडे यांनी म्हटले आहे. संबंधित अधिकाऱ्याविरोधात यापूर्वीही पुराव्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली होती. मात्र तक्रार करूनही अद्याप संबंधित दोषी अधिकाऱ्यावर कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या घरकुल योजनेपासून वंचित ठेवण्याच्या प्रकाराची तातडीने सखोल चौकशी करावी. चौकशीत दोष आढळल्यास संबंधित अधिकारी व संबंधित जबाबदार व्यक्तींवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. विशेषतः पात्र नागरिकांच्या अर्जांमध्ये फेरफार करून त्यांना योजनेपासून दूर ठेवण्यात आले आहे का याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास गावकऱ्यांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा ईश्वर तांबडे यांनी दिला आहे. संबंधित अधिकाऱ्यावर दहा दिवसांच्या आत निलंबनाची कारवाई करण्यात आली नाही तर संबंधित कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड तसेच वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे चिंचवण येथील प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांच्या प्रकरणाची प्रशासनाकडून काय दखल घेतली जाते आणि संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई होते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

cmyk

# साखर साठ्याची मर्यादा आणि कालावधी सरकारकडून निश्चित

## विक्रेत्यांसाठी सरकारने घेतला मोठा निर्णय

दिल्ली : वाढत्या साखरेच्या दरावर (डींसरी झीळलशी) नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करत आहे. साखरेचे दर अचानक वाढल्यामुळं ग्राहकांना मोठा फटका बसत आहे. दरम्यान, वाढत्या साखरेच्या दराच्या पार्श्वभूमीवर सरकारनं १० लाख टन साखरेची आयात करण्याचा निर्णय घेतला आहे.

यामुळं काही प्रमाणात साखरेच्या दराबाबत दिलासा मिळू शकतो. अशातच साखरेच्या साठा मर्यादेबाबत सरकारनं दिनांक २८ जुलै, २०२६ रोजी अधिसूचना निर्गमित केली होती. सदर साखर साठ्यावरील निर्बंधाचा आदेश दिनांक ३० नोव्हेंबर, २०२६ पर्यंत लागू राहील अशी माहिती सरकारनं दिली आहे. नेमका काय आहे आदेश याबाबतची माहिती पाहुयात.

साखरेच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ५० रुपये किलोने मिलणारी साखर ७० ते ८० रुपये किलोवर गेली आहे. दरावर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार विविध उपायोजना करत आहे. केंद्र शासनाने अत्यावश्यक वस्तू अधिनियम,



१९५५ च्या कलम ३ न्वये साखरेच्या साठा मर्यादेबाबत दिनांक २८ जुलै, २०२६ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर साखर साठ्यावरील निर्बंधाचा आदेश दिनांक ३० नोव्हेंबर, २०२६ पर्यंत लागू राहील असे नमूद केले आहे.

कोणताही साखर विक्रेता साखरेचा साठा प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत धारण करु शकणार नाही. तसेच कोणत्याही वेळी व कोणत्याही ठिकाणी ४००० क्विंटलपेक्षा अधिक साखरेचा साठा ठेवता येणार नाही. सदर निर्बंध शासनाच्या खात्यावरील साठ्यास तसेच राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या विक्रेत्यांमार्फत सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत रास्त भाव दुकानांमध्ये वितरणासाठी ठेवण्यात आलेल्या साठ्यास लागू राहणार नाहीत. सर्व साखर विक्रेत्यांनी अन्न व सार्वजनिक वितरण विभागाच्या पोर्टलवर साखरेच्या साठ्याची माहिती घोषित करून ती नियमितपणे अद्ययावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. सदर अधिसूचना दिनांक १ ऑगस्ट २०२६ पासून लागू होऊन ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत अंमलात राहणार आहे. सदर आदेशाची सक्त अंमलबजावणी करण्यात यावी असे पत्रकात सांगण्यात आले आहे.सरकारने ३१ ऑक्टोबरपर्यंत १० लाख टन साखरेच्या आयातीला परवानगी दिली असून शीतपेय व आईस्क्रीम उत्पादक, संबंधित व्यापारी आणि घाऊक ग्राहकांवर साठा मर्यादा निश्चित केली आहे. देशभरातील अनेक राज्यांनी केंद्र सरकारला साखरेची साठेबाजी आणि काळाबाजार याविरोधात कारवाई करण्याची विनंती केली आहे.

## पिक विमा अतिवृष्टी अनुदानासाठी शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरलच पाहिजे- प्रा. सुशीलाताई मोराळे

बीड । प्रतिनिधी

मराठवाडा हा कायम दुष्काळी, कमी पर्जन्यमान असलेला विभाग आहे. मान्सूनचा पाऊस कायम हुलकावणी देतो बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला तर वेळेवर पाऊस पडतो नाहीतर मान्सून पुढे पुढे सरकतो. कोस्टल आंध्राला वळसा घालतो आणि परतीचा पाऊस पडतो हा खेळ कायम सुरू असतो. शेती पावसावर अवलंबून असल्यामुळे कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ कधी अवकाळी पावसाचा फटका बसतो त्यामुळे पिक विमा आमचा शेतकरी भरतो २०२० ते २०२४ पर्यंत शेतकरीच विमा भरत होता मात्र २०२५ चा विमा सरकारने भरला शेतकऱ्याला फक्त १ रुपया भरावा लागला, असला तरी विमा कंपन्या विमा देत नाहीत. २०२५ ला अतिवृष्टी झाली शेती उध्वस्त झाले मुख्यमंत्र्यांचे उपमुख्यमंत्र्यांचे दौरे हेलिकॉप्टरने केले आणि देवेंद्रजींना शेतकऱ्यांची दया आली लगेच घोषणा १७५००/- हेक्टरी पिक विमा व पंचनाम्याप्रमाणे अतिवृष्टी अनुदान देऊ मात्र दीड वर्ष होत आले तरी पिक विमा मिळाला नाही. २०२६ चा विमा भरेपर्यंत पोर्टलवर २०२५ चा विमा दिसत होता मात्र आता तो गायब झाला आहे. सरकारच्या नियतीमध्येच खोट आहे असे प्रतिपादन राडी ता. अंबाजोगाई येथील शेतकरी संवाद आणि जातीय सलोखा कार्यक्रमाच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे.

किसान संघर्ष समिती, अखिल भारतीय किसान सभा, स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेतकरी कामगार पक्ष, शेतकरी संघटना रघुनाथ दादा पाटील सह समविचारी संघटनांच्या वतीने या सभेचे आयोजन केले होते. २०२५ पिक विमा, अतिवृष्टी अनुदान तात्काळ द्या. पूर्ण क्षमतेने १२ तास वीज द्या. जंगली जनावरांचा बंदोबस्त करा. उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा देऊन शेतीमालाला भाव द्या. शेतीपूरक उद्योगधंद्याला शून्य टक्के व्याजदराने भांडवल उपलब्ध करून द्या. शेतकऱ्यांच्या मुलांना केजी टू पीजीपर्यंत मोफत गुणवत्तापूर्ण शिक्षण द्या या मागण्यासाठी जनजागृती करण्यासाठी या सभेचे आयोजन केले होते. याप्रसंगी माजी सभापती राजेसाहेब देशमुख, कालिदास आपेट, एडवोकेट अजय बुरांडे, प्रकाश भन्साळी, वसंतराव मोरे, अशोक नाना गंगणे, उद्धव बापू आपेगावकर, प्रशांत गंगणे, नरसिंह कदम दाजी, अच्युतराव गंगणे इत्यादी नेत्यांनी मार्गदर्शन केले राडीचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने या सभेला हजर होते.

## कोथिंबिरीच्या पिकामध्ये फिरवला रोटाव्हेटर

### पिंपळगाव रेणुकाई येथे पिकात जनावरे सोडली चरायला

भाजीपाला पिकाला बाजारात कवडीमोलाचा भाव मिळावा अन् मेहनतीचे मोल तर दूरच, लागवडीचा खर्चही खिशातून भरावा लागावा असा दुहेरी फटका सध्या भोकरदन तालुक्यातील शेतकऱ्यांना बसत आहे. तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील मंगळवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात भाजीपाल्याचे दर कमालीचे कोसळले आहेत. यामुळे संतप्त व शेतकऱ्यांवर स्वतःच्या हाताने पिके उद्ध्वस्त करण्याची दुर्दैवी वेळ आली आहे. अनेक शेतकऱ्यांनी उभ्या कोथिंबिरीच्या शेतात रोटाव्हेटर फिरवून आपला आक्रोश व्यक्त केला आहे. दरात घसरण झाल्याने पिंपळगाव रेणुकाई येथे भाजी पिकात जनावरे चरायला सोडली होती.

भोकरदन तालुक्यातील ग्रामीण भागात वर्षानुवर्षांपासून खरीप व रब्बी हंगामात सोयाबीन, कापूस, मका यासारखी पारंपरिक पिके घेतली जातात. मात्र, निसर्गाची अवकृपा, निसटता पाऊस, बाजारातील अनिश्चितता यांमुळे या पारंपरिक पिकांमधून शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागत नव्हते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी, कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी पिंपळगाव रेणुकाई व परिसरातील बळीराजाने भाजीपाला शेतीचा मार्ग निवडला. टोमॅटो, वांगी, मिरची, कोथिंबीर, मेथी, इतर पालेभाज्यांची मोठ्या आशेने लागवड केली. पाण्याचे नियोजन केले. खतांचा महागडा खर्च सहन केला. पिके फुलवली. परंतु, बाजारात



विक्रीसाठी आणल्यानंतर शेतकऱ्यांची ही आशा साफ धुळीस मिळाली आहे. मंगळवारच्या आठवडी बाजारात भाजीपाल्याची आवक मोठ्या प्रमाणात झाली होती. परंतु, खरेदीदारांचा प्रतिसाद, व्यापाऱ्यांनी लावलेले भाव पाहता शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. बियाणे, खते, औषध फवारणी, मजुरी, बाजारात माल आणण्यासाठी लागणारा वाहतूक खर्च याचा ताळमेळ बसवणे अशक्य झाले आहे. बाजारात आणलेला भाजीपाला अवघ्या दोन ते तीन रुपये किलो दराने मागितला जात आहे. कोथिंबिरीची एक जुडी ५० पैसे ते एक रुपयालाही घेण्यास व्यापारी तयार नाहीत. भाजीपाला बाजारात आणून विकल्यानंतर मिळालेल्या पैशातून टेम्पोचे भाडेही निघत नसल्याने शेतकऱ्यांना घरून पैसे देऊन रिकाम्या हाताने परतावे लागले. एकीकडे सर्व भाजीपाल्याचे भाव गडगडले आहे तर दुसरीकडे अद्रकाचे भाव मागील काही महिन्यांपासून कडाडलेच आहेत. सध्या बाजारात अद्रकाचे दर २४० रुपये किलो आहे.

## लासूर स्टेशनच्या कांदा मार्केटला पंधरा दिवसांत १लाख ५८हजार क्विंटलची आवक

लासूर स्टेशन मराठवाड्यातील दोन नंबरची बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासूर स्टेशन येथील बाजार समितीच्या कांदा मार्केटला दोन दिवसांच्या सुट्टीनंतर सोमवारी मोठ्या प्रमाणात आवक वाढली. चांगल्या कांद्याला ४७४५ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला तर सरासरी चार हजार गोलटी कांदा दोन हजाराने विकला आहे, अशी माहिती बाजार समितीचे सचिव संतोष पवार यांनी दिली आहे.दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी तसेच रविवारी बँकेला सुट्टी असल्याने येथील कांदा मार्केटदेखील बंद ठेवण्याचा संचालक मंडळाने निर्णय घेतलेला आहे. १ ते २४ ऑगस्ट २०२६ दरम्यान येथील कांदा मार्केटला तब्बल १ लाख ५८ हजार २०६ क्विंटल कांद्याची आवक झाल्याची माहिती बाजार समितीचे मंडी विश्लेषक संतोष दिवेकर यांनी दिली आहे. सध्या आठवडी बाजारातदेखील चांगल्या कांद्याचे भाव चाळीस रुपये किलो आहेत.

विशेष म्हणजे येथील संपूर्ण कांदा मार्केटमधील सक्रिय ४० कांदा व्यापाऱ्याकडून शेतकऱ्यांचा कांदा उघड लिलावद्वारे खरेदी केला जातो. महिन्याभरापासून संचालक बोर्डाने घेतलेल्या निर्णयाची कडक अंमलबजावणी सुरू असल्याने कांद्याची पट्टी झाल्याबरोबर शेतकऱ्यांना रोखीने पैसे दिले जातात, अशी खात्री सभापती शेषरावनाना जाधव यांनी दिव्य मराठीकडे दिली आहे. येथील कांदा मार्केटमध्ये तसे लायसन्सधारक ९३ व्यापारी आहेत. परंतु नियमित लिलावामध्ये कमीजास्त तिसाहून अधिक व्यापारी सहभागी राहतात.शेतकऱ्यांनी आणलेल्या वाहनातील मोकळ्या कांद्याचा व्यापाऱ्याकडून उघड लिलाव करण्यात येतो. त्यानंतर वजन झाल्यावर शेतकऱ्यांना



पट्टीचे रोख पैसे दिले जातात. दरम्यान, दररोज येथे जिल्हाभरातून आठशे ते हजार वाहनातून कांद्याची आवक येत असते. सकाळ-दुपार अशा दोन सत्रांत हा लिलाव केला जातो. जिल्ह्यासह शेजारील जिल्ह्यातूनही आवक लासूर स्टेशन येथील कांदा मार्केटला सर्वाधिक आवक गंगापूर आणि वैजापूर तालुक्यातील शेतकऱ्याकडून येत असते, त्याचबरोबर पैठण, खुलताबाद, कन्नड, फुलंब्रीसह नाशिक जिल्ह्यातील नांदगाव बोलठाण, जातेगाव, मनेगाव, रोहेला, मुंगसापूर, तसेच येवल्याजवळील शेतकरी लासूरला कांदा विक्रीसाठी घेऊन येतात. लासूर स्टेशन येथील मार्केटला शेतकऱ्यांनी आणलेला कांदा.

यात उन्हाळी कांद्याला जास्तीचा भाव ४७४५ कमी भाव ५०० तर सरासरी ३९५० रुपये क्विंटल भाव मिळाला आहे तसेच मार्केटमध्ये दररोज बाजार भाव शंभर-दोनशे रुपयांनी कमीजास्त होत असतो. परंतु, मागील आठवड्यापासून चार हजारांवर कांद्याच्या भावात वाढ झाली आहे. गेल्या १५ दिवसांत १ लाख ५८ हजार २०६ क्विंटल कांद्याची आवक झाल्याची बाजार समितीत नोंद आहे. शेतकऱ्यांनी प्रतवारी करून कांदा आणावा, भाव मिळेल थशेतकऱ्यांनी कांदा विक्रीला आणतांना प्रतवारी करून आणावा, जेणेकरून चांगला भाव मिळेल. खराब कांदा थोडाच असतो. परंतु तो न निवडल्यामुळे चांगल्या कांद्याचा भाव कमी करतो. येथून पुढे कांद्याचे भाव वाढत राहणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाईगर्दी करू नये. परतवारी करून कांदा विक्रीसाठी आणावा. -योगेश तायडे, कांदा व्यापारी शेतकऱ्यांनी कांदा विक्रीनंतर पट्टीचे पैसे नगदी घ्यावे थकांदा विक्रीनंतर शेतकऱ्यांनी पट्टीचे पैसे नगदी घ्यावे. ज्या व्यापाऱ्यांनी पैसे बाकी ठेवले असतील अशा शेतकऱ्यांनी आमच्या बाजार समिती कार्यालयाकडे पट्टीची झेरॉक्स देऊन कळवावे, अशा व्यापाऱ्यांवर बाजार समितीकडून कडक कारवाई केली जाईल. लिलावामध्ये ४३५५ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला लासूरच्या कांदा मार्केटला २१ क्विंटल कांदा विक्रीसाठी आणला होता. उघड लिलावामध्ये ४३५५ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला. पट्टी झाल्यावर व्यापाऱ्याकडून गोडाऊनला कांदा खाली केल्याबरोबर ९१ हजार २५० नगदी पेमेंट मिळाले

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८१ : मैसूर शासक हैदर अली यांनी ब्रिटीश सरकारच्या इस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याशी पोल्लीलूर ची लढाई लढली.
१९३९ : सर फ्रँक व्हीटल आणि हॅन्स ओहायन यांनी शोध लावलेल्या क्शळपज्ञशश्र क्श १७८ या जगातील पहिल्या टर्बो जेट विमानाचे उड्डाण झाले.
१९५७ : मलेशियाची राज्यघटना अमलात आली.
१९६२ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने शुक्र ग्रहाची तपासणी करण्यासाठी चरीळपशी २  हे यान प्रक्षेपित केले.
१९६६ : वसंत कानेटकर लिखित पुरुषोत्तम दारव्हेकर दिग्दर्शित अश्रूंची झाली फुले या नाटकाचा मुंबईत पहिला प्रयोग.
१९७२ : वन्यजीव संरक्षण कायदा संमत.
१९९१ : मोल्डोव्हाने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले. १९६६ : नाट्यसंपदा निर्मित, वसंत कानेटकर लिखित व पुरुषोत्तम दारव्हेकर दिग्दर्शित 'अश्रूंची झाली फुले' या नाटकाचा पहिला प्रयोग गिरगाव येथील साहित्य संघ मंदिर येथे झाला.
१९९१ : युरोपिअन महासंघाने इस्टोनिया, लाटव्हिया व लिथुआनियाच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली.
१९९९ : कारगिल संघर्षाच्या वेळी भारताने बंदी घातलेल्या पाकिस्तानी कैद्यांना सोडून दिल.
१९९९ : सोनाली बॅनर्जी या आपली चार वर्षांची मेहनत पूर्ण करून देशातील पहिल्या सागरी अभियंता बनल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५४ : गणेश श्रीकृष्ण तथा 'दादासाहेब' खापर्डे - प्रख्यात कायदेपंडित, विद्वान आणि राजकीय नेते, लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, 'वर्हाडचे नबाब' (मृत्यू: १ जुलै १९३८)
१८५९ : सर दोराबजी टाटा - उद्योगपती व लोकहितबुद्धी (मृत्यू: ३ जून १९३२)
१८७७ : रॉल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक चार्ल्स रॉल्स यांचा जन्म. (मृत्यू: १२ जुलै १९१०)
१९०८ : सर डोनाल्ड ब्रॅडमन - ऑस्ट्रेलियन फलंदाज, संघनायक व विक्रमवीर. १९४९ मध्ये त्यांना 'सर' हा किताब देण्यात आला. (मृत्यू: २५ फेब्रुवारी २००१)
१९०८ : लिंडन बी. जॉन्सन - अमेरिकेचे ३६ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २२ जानेवारी १९७३)
१९१० : सेतू माधवराव पगडी - इतिहासकार, विचारवंत, संशोधक, लेखक, वक्ते, तत्त्वचिंतक, समीक्षक, इतिहासाचे भाष्यकार, कार्यक्षम मुलकी अधिकारी, प्रशासक, 'गॅझेटियर्स'चे संपादक असे विविधांगी पैलू असलेले व्यक्तिमत्त्व. गोंडी व कलामी या आदिवासींच्या बोलिंवर त्यांनी लिखाण केले. 'जीवनसेतू' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (मृत्यू: १४ आक्टोबर १९९४)
१९१६ : रेंज रोव्हर चे सहरचनाकार गॉर्डन बाशफोर्ड यांचा जन्म. (मृत्यू: २१ सप्टेंबर १९९१)
१९१९ : वि. रा. करंदीकर - प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी लेखक, संतसाहित्याचे अभ्यासक तसचं, राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व मराठी ज्ञानकोशाचे संपादन करणारे (मृत्यू: १५ एप्रिल २०१३)
१९२५ : नारायण धारप - भारतीय महाराष्ट्रीयन मराठी रहस्यकथाकार व लेखक आणि नाटककार (मृत्यू: १८ ऑगस्ट २००८)
१९२५ : भारतीय कवीजसवंत सिंग नेकी यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर २०१५)
१९३१ : भारतीय अध्यात्मिक गुरु चिन्मोय कुमार घोस उर्फ श्री चिन्मोय यांचा जन्म. (मृत्यू: ११ ऑक्टोबर २००७)
१९७२ : मल्ल दिलीपसिंग राणा ऊर्फ ग्रेट खली यांचा जन्म. - भारतीय व्यावसायिक कुस्तीपटू(रेसलर) द ग्रेट खली या रिंग नावाने परिचित
१९८० : भारतीय अभिनेत्री नेहा धुपिया यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७५ : बँक ऑफ कॅलिफोर्निया चे संस्थापक विलियम चॅपमन राल्स्टन यांचे निधन. (जन्म: १२ जानेवारी १८२६)
१९५५ : जगन्नाथ रघुनाथ आजगावकर - संतचरित्रकार, १९०७ ते १९३५ या काळात त्यांच्या 'महाराष्ट्र कविचरित्र' या ग्रंथाचे नऊ खंड प्रकाशित झाले होते. (जन्म: १६ ऑगस्ट १८७९)
१९७६ : मुकेश चंद माथूर तथा 'मुकेश' - पार्श्वगायक. तीस वर्षांच्या फिल्मी कारकिर्दीत त्यांनी १०,००० हून अधिक गीतांना आवाज दिला. ऊर्दू, पंजाबी, तमिळ, बंगाली, मराठी, गुजराथी या भाषांतही त्यांनी गाणी गायली. अनुनासिक स्वर आणि गायकीत ओतप्रोत भरलेलाअ 'दर्द' ही त्यांच्या गायनशैलीची वैशिष्ट्ये होती. (जन्म: २२ जुलै १९२३)
१९७९ : लॉर्ड लुई माउंटबॅटन - भारताचे शेवटचे व्हॉईसरॉय आणि स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल (जन्म: २५ जून १९००). ब्रिटीश कालीन भारतातील शेवटचे व्हॉईसरॉय व स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल तसचं, भारत देशाची फाळणी करून नवीन पाकिस्तान देशाची निर्मिती करणारे ब्रिटीश अधिकारी
१९९५ : मधू मेहता - हिन्दुस्तान आंदोलनाच्या माध्यमातून भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देणारे सामाजिक कार्यकर्ते (जन्म:)
२००० : मनोरमा वागळे - रंगभूमी, चित्रपट व मालिकांमध्ये विविध भूमिका केलेक्या अभिनेत्री (जन्म: ? ? १९२८)
२००६ : हृषिकेश मुकर्जी - चित्रपट दिग्दर्शक (जन्म: ३० सप्टेंबर १९२२)



राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत

गुरूवार दि.२७ ऑगस्ट २०२६ ५



# सोळा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन गर्भवती केल्याप्रकरणी आरोपीला १० वर्षे सक्त मजुरी

जालना। प्रतिनिधी

मा. विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश, यांनी आरोपी नितीन पोटदुखे, वय १९ बर्षे व शिवाजी कालबिले वय वर्षे २९ आणि बाली उर्फ किरण कालबिले सर्व रा. भारणी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांना शिक्षा ठोठावली. नितीन पोटदुखे मांस पालम ३७६ (२) (एन) भादवी व कलम ४ व ०८ बाल लैगिंक अत्याचार संरक्षण कायदा नुसार गुन्हा सिध्द झाल्यामुळे १० वर्षे सक्त मजुरी व दहा हजार रूपये दंड व दंड न भरल्यास सहा महिने सक्त कारावासाची शिक्षा ठोठावली तसेच आरोपी नितीन, व बाली उर्फ किरण यांना कलम ३६३ सह ३४ भा.दं.वि. अन्वये सहा महिने सक्त मजूरी व पाच हजार रूपये दंड व दंड न भरल्यास एक महिना सक्त कारावास अशी शिक्षा दिली.

घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, या प्रकरणातील पिडीत मुलगी १६ वर्षांची आहे. आरोपी व पिडीता यांची गावे जवळ जवळ आहेत. आरोपी नितीनकडे छोटा हत्ती गाडी आहे. पिडीता इतर मजुरासह आजूबाजूच्या खेडयात आरोपीच्या वाहनातून कामाला जात होती. आरोपीने पिडीतेशी ओळख वाढवून भारखेडा शिवारात फिर्याद देण्यापूर्वी सात ते आठ महिन्यापासून शारीरीक संबंध केले त्यामुळे पिडीता गर्भवती राहिली. ती तिच्या आई सोबत तिच्या नातेवाईकाकडे राहण्यासाठी गेली. आरोपी त्याच्या बहिणीला व मेव्हण्याला पिडीता राहत असलेल्या ठिकाणी घेवून गेला व पिडीतेला रिक्षात बसवून नितीनच्या मित्राकडे घेवून गेले. त्यांनी पिडीतेला तेथे आठ ते दहा दिवस ठेवले. आरोपी बाली व शिवाजी यांनी आरोपी व पिडतेला जेवण आणून दिले व त्यांच्या मदतीने आरोपीने पिडीतेसोवत किरायाच्या खोलीमध्ये शरीर संबंध केले. यावेळी आरोपीने पिडीतेला लग्नाचे आमीष दाखवले होते.आरोपी नितीन वडिलांच्या सांगण्यावरून पिडीतेला घेवून करमाड पोलीस



स्टेशन येथे हजर झाला. त्यापूर्वी पिडीतेच्या आईने दि. १२/०७/२०१९ रोजी जवाहर नगर पोलीस स्टेशनला पिडीता हरवल्याबाबत रिपोर्ट दाखल केला होता. पोलीस स्टेशनमध्ये आणल्यानंतर पिडीवेला महिला सुधार गृहात पाठवण्यात आले. परंतू पिठीत मुलीने आई कडे जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे तिला सुधार गृहातून सोडवून आणले गेले. आई-वडिलांनी विचारपूस केल्यानंतर तिने सविस्तर हनीगत सांगीतली. दि. २७/०९/२०१९. रोजी जवाहर नगर पोलीस स्टेशनला आरोपी विरूध्द महिला दक्षता समितीच्या सदस्यासमोर आरोपी विरूध्द पिडीतेने फिर्याद दाखल केली. सदरची फिर्याद पारध पोलीस स्टेशन येथे गुन्हा कं. १३५/२०१९ कलम ३६३,३७६,५०६ सह ३४ व कलम ३,४,७,८ पोक्सो कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर आरोपी विरूध्द दोषारोपप्रत्र पाठविण्यात आले.

सरकार पक्षातर्फे सदर प्रकरणात एकूण ८ साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्येपिडीत मुलगी, तिचे वडिल, घटनास्थळ पंच किशोर सोळंके, पिडीतेची जन्म तारखी सिध्द करणारे शाळेचे मुख्याध्यापक अलीबाबा रशिद तडवी व पोलीस साक्षीदार संदीप तागड, श्रध्दा वायदंडे व तपासीक अमंलदार रविंद्र. साळोखे, व सुनिल जायभाये यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या. पिडीत मुलीचे वय सिध्द करण्यासाठी शाळेने दिलेला निर्गम उतारा हा महत्वाचा पुरावा ठरला.या प्रकरणात आरोपी व पिडीतेचा वैद्यकिय अहवाल व पिडितेला झालेल्या बाळाचा डीएनए अहवाल आरोपीला मान्य आहे.मा. न्यायालयाने सरकारपक्षातर्फे दिलेला पुरावा व युक्तीवाद लक्षात घेवून आरोपी क. १ नितीन पोटदुखे यांस कलम ३७६ (२) (एन) भादवी व कलम ४ व ८ बाल लैगिंक अत्याचार संरक्षण कायदा नुसार गुन्हा सिध्द झाल्यामुळे १० वर्षे सक्त मजुरी व दहा हजार रूपये दंड व दंड न भरल्यास सहा महिने सक्त कारावासाची शिक्षा ठोठावली तसेच आरोपी नितीन, शिवाजी व बाली उर्फ किरण यांना कलम ३६३ मा. अति. जिल्हा व सत्र न्यायालय-०४, जालना यांचा महत्वपूर्ण निकालसोळा वर्षाच्या अल्पवयीन मुलीसोबत शारीरीक संबंध करून तिला गर्भवती करणा-या आरोपी नितीन दत्तू पोटदुखे यास १० वर्षे सक्त मजुरी व या आरोपीस मदत करणा-या आरोपींना प्रत्येकी सहा महिने सक्त मजूरीची शिक्षा व एकूण २०,०००/- रूपये दंड २५/०८/२०२६ मा. विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना मा. कृपेश मोरे साहेब यांनी आरोपी क. १ नितीन दत्तू पोटदुखे, वय १९ बर्षे व आरोपी शिवाजी विश्वनाथ कालबिले वय वर्षे २९ आणि बाली उर्फ किरण शिवाजी कालबिले सर्व रा. भारणी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांना शिक्षा ठोठावली. आरोपी क. १ नितीन पोटदुखे मांस पालम ३७६ (२) (एन) भादवी व कलम ४ व ०८ बाल लैगिंक अत्याचार संरक्षण कायदा नुसार गुन्हा सिध्द झाल्यामुळे १० वर्षे सक्त मजुरी व दहा हजार रूपये दंड व दंड न भरल्यास सहा महिने सक्त कारावासाची शिक्षा ठोठावली तसेच आरोपी नितीन, शिवाजी व बाली उर्फ किरण यांना कलम ३६३ सह ३४ भा.दं.वि. अन्वये सहा महिने सक्त मजूरी व पाच हजार रूपये दंड व दंड न भरल्यास एक महिना सक्त कारावास अशी शिक्षा दिली.

## गायरान जमीनीवरील अतिक्रमण धारकांच्या पिक पेऱ्याची नोंद घ्या

### शेतकरी मेळाव्यात वंचित हक्क अंदोलनाची रेणापूर तहसीलदारांकडे मागणी



रेणापूर । प्रतिनिधी

लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंती निमित्त जे.व्ही.एस संस्था पानगाव आयोजित परिवर्तन संस्था सुमठाणा ता. अहमदपूरच्या वतीने मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकऱ्यांचा मंगळवार (दि.२५ ) रोजी रेणापूर येथे शेतकरी मेळावा घेण्यात आला. १९८० पासुन रेणापुर तालुक्यातील विविध गावातील अनुसुचित जातीच्या भुमिहिनांनी सरकारी गायरान जमिनीवर अतिक्रमण करून.त्या जमिनीवर पेरणी केली असून त्या पिकांची नोंद महसुल विभागाने करावी अशी मागणी वंचीत हक्क अंदोलन महाराष्ट्रच्या वतीने शेकडो गायरानधारकांना सोबत घेऊन निवेदनाव्दारे रेणापूरच्या तहसीलदारांकडे केली आहे

रेणापूर येथील संस्थेच्या कार्यालयात मंगळवार दि.२५ रोजी लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंती निमित्त पानगाव, तत्तापुर, गरसुळी, आरजखेडा, डिघोळ देशमुख, पोहरेगाव, बावची, मोटेगाव येथील गायरान धारक शेतकऱ्यांकरिता पिक पेरा नोंदनी विषयी मेळावा आयोजित करण्यात आला होता.या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी बालाजी शिंदे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून नागनाथ चव्हाण,माधव सिरसाट,विष्णू आचार्य,राहूल गंडले उपस्थित होते. सन १९८० पासुन अनुसुचित जातीच्या भूमिहीन कुटूंबीयांनी सरकारी गायरान जमिनीवर तुर,मुग, उडीद,ज्वारी,बाजरीचे पिक घेवुन आपली उपजिविका चालवित आहेत.त्यांच्या ताब्यात असलेल्या जमीनी हेच त्यांचे उपजिवीकेचे मुख्य साधन आसल्याचे मत नागनाथ चव्हाण यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना म्हटले आहे. भूमिहीन शेतकऱ्यांनी आपल्या ताब्यात असलेल्या जमिनीत लागवड केलेल्या पिकांची जिन्नसवार नोंद करावी अशी मागणी वंचीत हक्क अंदोलन महाराष्ट्रच्या वतीने रेणापूर तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.या निवेदनावर वंचित हक्क आंदोलन महाराष्ट्र चे नागनाथ चव्हाण,बालाजी शिंदे,माधव सिरसाट,विष्णु आचार्य,दिगांबर चव्हाण,अंकुश चिकटे,प्रणिता आचार्य,चांदणी गायकवाड , बालिका चिकटे, किरण शाहीर, मोहन वायदंडे, नवनाथ देडे,सतिष शिंदे,संजय गायकवाड, वाल्मिक घोडके,किशोर कसबे, गौतम आचार्य, नरसिंग आचार्य आदिसह शेकडो गायरान धारकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. पार पडलेल्या मेळाव्यात मयुर राहूल गंडले याचा शासकिय कोट्यातू एम.बी.बी.एस करिता निवड झाल्याबद्दल रेणापूर तालुक्यातील गायरान धारकांच्या वतीने शाल पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

## शेतकऱ्याची पिकांचे मोठे नुकसान विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करा

### मुख्यमंत्री यांच्याकडे आ.लोणीकर यांची मागणी

जालना। प्रतिनिधी

मराठवाड्यात जून व जुलै महिन्यात झालेल्या अत्यल्प व खंडित पावसामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका यांसह खरीप पिके गंभीर संकटात सापडली आहेत. जमिनीतील ओलावा संपल्याने अनेक ठिकाणी पिकांनी माना टाकल्या असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेसह विशेष आर्थिक पॅकेजद्वारे मदत द्यावी, अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.यासंदर्भात आमदार लोणीकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र देऊन मराठवाड्यातील सद्यस्थितीची माहिती दिली. पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे विहिरी व बोअरवेल आटत असून पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी व चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होत असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.



शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन ३१ जुलै २०२६ रोजी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा अर्ज भरण्याची मुदत किमान १५ दिवसांनी वाढविण्याची मागणी करण्यात आली होती. शासनाने सकारात्मक निर्णय घेत मुदतवाढ दिल्याबद्दल लोणीकर यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. मात्र, सध्याची परिस्थिती अत्यंत गंभीर असून केवळ मुदतवाढ पुरेशी नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नुकसानग्रस्त सर्व पिकांचे तातडीने प्रत्यक्ष पंचनामे करावेत, पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याची नुकसानभरपाई तातडीने मिळवून द्यावी, तसेच पीक विम्याच्या कक्षेबाहेर राहिलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.याशिवाय सोयाबीनसह सर्व खरीप पिकांसाठी हेक्टरी विशेष नुकसानभरपाई द्यावी, पीक कर्जाच्या वसुलीस स्थगिती देऊन कर्जाचे पुनर्गठन करावे, पुढील हंगामासाठी बियाणे, खते व कृषी निविष्ठांसाठी विशेष मदत द्यावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत.जनावरांसाठी चारा डेपो व चारा छावण्या सुरू करून पाण्याची व्यवस्था करावी. गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा. तसेच परिस्थितीचा गावनिहाय आढावा घेऊन आवश्यक भागात दुष्काळसदृश परिस्थितीबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार लोणीकर यांनी केली आहे.मराठवाड्यातील शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीत असून शासनाने संवेदनशील भूमिका घेऊन पीक विमा, विशेष आर्थिक पॅकेज, कर्ज सवलत तसेच पाणी व चारा उपलब्ध करून देत शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, असे आवाहन आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना केले आहे.

## शिरपूर येथे दारुविक्री विरोधात महिला आक्रमक

मंठा। प्रतिनिधी

तळणी पोलीस चौकी अंतर्गत येणाऱ्या शिरपूर गावात अवैध देशी व गावठी दारूविक्रीविरोधात महिलांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. गावात सहज उपलब्ध होणाऱ्या दारूमुळे त्रस्त झालेल्या महिलांनी ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव घेतला. सरपंचांच्या पुढाकारातून पोलीस अधिकाऱ्यांना गावात बोलावून महिलांनी आपल्या तक्रारी मांडल्या. परतूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे, मंठा पोलीस ठाण्याचे निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख व पोलीस उपनिरीक्षक संतोष माळगे मंगळवारी (ता. २५) सकाळी शिरपूर येथे आले. यावेळी महिलांनी अवैध दारूविक्रीबाबत निवेदन देत संबंधित विक्रेत्यांवर कारवाईची मागणी केली.

सरपंच शिवाजी थोरवे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष बाबाराव गुंड यांच्यासह महिला व नागरिक उपस्थित होते.



कारवाईचे आश्वासनमहिलांनी दारूविक्रेत्यांची नावे पोलिसांना दिली. तक्रारींची दखल घेत उपविभागीय पोलिस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनी संबंधितांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्याचे आश्वासन दिले. दारूविक्रीचा प्रश्न महिलांनी प्रथम सरपंच शिवाजी थोरवे यांच्याकडे मांडला होता. त्यानंतर गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी दारूविक्रेत्यांना विक्री बंद करण्याची समज दिली. काहींनी विक्री बंद केली; मात्र एक-दोन जणांकडून विक्री सुरूच राहिल्याने महिलांनी थेट पोलिसांकडे धाव घेतली.

## संत ज्ञानेश्वर विद्यालयात राखी बनवा कार्यशाळा

पाथर्डी। प्रतिनिधी

भारतीय सीमेवर अहोरात्र पहारा देऊन देशाच्या रक्षणासाठी तत्पर असणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पाथर्डी येथील सहदेव दादा शिरसाठ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन उत्सवाच्या पार्श्वभूमीवर एका विशेष व कौतुकास्पद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले भारतीय सीमेवरील जवानांसाठी राखी बनवा या उपक्रमांतर्गत विद्यालयात एक भव्य कार्यशाळा उत्साहात पार पडली विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच देशभक्तीची भावना रुजणे भारतीय सैनिकांच्या अतुलनीय त्यागाची जाणीव होणे आणि मुलांच्या कलागुणांना वाव मिळणे या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यशाळेत विद्यालयातील शिक्षिकांनी विद्यार्थिनींना पर्यावरणपूरक आकर्षक आणि नावीन्यपूर्ण राख्या बनवण्याचे प्रात्यक्षिकांसह सखोल मार्गदर्शन केले विद्यालयातील जवळपास १५० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या उपक्रमात अत्यंत स्वयंस्फूर्तीने आणि उत्साहाने सहभाग घेतला विद्यार्थिनींनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या या राख्या केवळ रेशमी धागा नसून त्यात जवानांच्या दीर्घ आयुष्यासाठी आणि सुरक्षेसाठी केलेल्या प्रार्थना व



प्रेमाचा भाव सामावलेला होता तयार करण्यात आलेल्या सर्व राख्या भारतीय सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांसाठी सन्मानपूर्वक रवाना करण्यात आल्या आहेत उपक्रमाबद्दल संस्थेचे सचिव महेंद्र शिरसाट यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे विशेष कौतुक केले ते म्हणाले शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांवर राष्ट्रभक्तीचे आणि उच्च संस्कारांचे सिंचन करणे हे सहदेव दादा शिरसाठ शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य ध्येय आहे सीमेवरील जवानांसाठी राख्या पाठवण्याचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशाभिमानाची ज्योत सतत प्रज्वलित राहील तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश मिसाळ पर्यवेक्षक आत्माराम दहिफळे आणि सर्व शिक्षकवृंदांनी सहभागी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक करून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## मुळा धरणातून वांबोरी चारी,पाटचाऱ्या भगवानगड व ३५ गावात पुनर्निर्मित करा!

### मुख्यमंत्री महोदय संत भगवानबाबांच्या भूमीत शेती सिंचन पाण्यासाठी वॉटर ग्रीन फिल्ड प्रकल्प पूर्ण करा

प्रा.दादासाहेब खेडकर

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील भगवानगड परिसर हा अनेक दशकांपासून दुष्काळी पट्टा असल्याने व तेथील ऊसतोड मजूर शेतकरी कामगार कष्टकरी शेतकरी व्यापारी हे स्थलांतरित मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात शेतीसाठी व पिण्यासाठी दुष्काळसदृश्य परिस्थितीत पाणी नसल्याने शेती व शेतीपूरक व्यवसाय ठप्प पडल्याने भगवानगड आणि परिसरातील ३५ गावांमध्ये पिण्याचे पाणी शेतीसाठी पाणी नसल्याने अनेक पिढ्यांपासून संसार उध्वस्त झाले आहेत शेतकऱ्यांनी आत्महत्या देखील केले आहेत ऊसतोड मजुरांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळत नसल्याने येथील ऊसतोड मजूर कष्टकरी शेतकरी हा ब्रिटिश राजवटी सारखा कायम गुलाम असल्याच्या भावना त्यांच्या मनामध्ये आजही घर करून आहेत पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील टाकळीमानुर आणि भालगाव जिल्हा परिषद गटातील जवळपास ३५ गावांमध्ये आजही पिढ्यानपिढ्या येथील शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी व शेती सिंचनाच्या पाण्यासाठी झुंजावे लागत असल्याने गेल्या सात दशकात अनेक पिढ्यांपासून राजकारण समाजकारण अर्थकारण चालू आहे परंतु तिथल्या शेतकऱ्यांच्या ऊसतोड मजूर कामगारांच्या समस्या जैसे थे आहेत महाविकास आघाडी सरकार असताना २०१९ यावर्षी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा मंजूर केली २०३ कोटी रुपये या प्रकल्पासाठी निधी मंजूर झाला परंतु गेल्या सात वर्षापासून भगवानगड व ४६ गावच्या पाणीपुरवठा योजनेचा बट्ट्याबोळ झालेला दिसून येत आहे काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाक्या झाल्या पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील ४६ गावांमध्ये पाईपलाईनचे काम झाले परंतु प्रत्यक्षात जायकवाडी जलाशयातून भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजना प्रत्यक्षात मूर्त स्वरूप



प्राप्त करू शकले नाही याचे तांत्रिक कारण काय आहे याचे उत्तर संक्षिप्त आहे परंतु ही योजना प्रत्यक्षात अमलात न आल्याने आजही भगवानगड ४६ गाव परिसरातील माता माऊली शेतकरी ऊसतोड मजूर पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करताना दिसत आहेत दुसरीकडे राहुरी तालुक्यातील सह्याद्रीच्या कळसुबाई शिखर पर्वताच्या कुशीत १९५८ ते १९७२ यादरम्यान मुळा धरणाची निर्मिती केली गेली मुळा धरणात सरासरी वार्षिक पाऊस ५०८० किमी होतो तसेच मुळा धरणाची पाणलोट साठवणूक क्षमता असे ९४१.८८ दशलक्ष घनमीटर आहे मुळा धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्या माध्यमातून राहुरी नेवासा शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यातील शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सोडले जाते परंतु पाथर्डी तालुक्यातील कासार पिपळगाव अमरापूर कोरडगाव इथपर्यंत वांबोरी चारीच्या पाटचाऱ्या आहेत परंतु तिथून पुढे पूर्व भागातील भगवानगड परिसर आणि त्याला जोडलेली ३५ गावे ही आजही वांबोरी चारीच्या पाटपाण्याचे वाट पाहत आहेत यामुळे नाशिक जिल्ह्यात अतिवृष्टी पाऊस झाल्यास नाशिकच्या गोदावरी नदीतून पाण्याचा विसर्ग पैठण येथील नाथसागर जायकवाडी जलाशयात होतो आणि नाथसागर जलाशय १००% भरल्यास २७ दरवाजे उघडून अतिरिक्त पाणी मराठवाड्यातील बीड नांदेड जालना छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी पाणी मिळते असेच गोदावरी नदीचे अतिरिक्त विसर्गाचे पाणी व मुळा धरण ओव्हर फ्लो झाल्यावर मुळा धरणातील अतिरिक्त पाणी नेवासा तालुक्यातील प्रवरा नदीला येऊन मिळते तिला प्रवारासंगम असे म्हणतात हेच अतिरिक्त पाणी पाथर्डी तालुक्यातील मिरी करंजी तिसगाव कासार पिंपळगाव हनुमान टाकळी अमरापुर पर्यंत वांबोरी चारीच्या माध्यमातून मिळते हेच मुळा धरणाचे पाणी पूर्व भागातील भगवानगड परिसर व ३५ गावांना उपलब्ध होऊ शकते फक्त त्यासाठी वांबोरी चारी पाटचाऱ्या पुनर्निर्माण करण्याची आवश्यकता आहे यासाठी आमदार मोनिका राजळे यांच्या माध्यमातून पालकमंत्री व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रकल्प तातडीने राबवून भगवानगड परिसरातील भटक्या ऊसतोड मजूर कामगार शेतकरी कष्टकरी श्रमिक व्यापारी यांच्या सिंचनाच्या शेतीसाठी व पिण्याच्या पाण्याची वैश्विक व्यवस्था करण्याची गरज आहे परंतु वांबोरी चारीचे अपूर्ण व अर्धवट राहिलेले पाटचाऱ्यांचे पुनर्निर्मनाचे काम कोणत्या महात्म्याच्या माध्यमातून होईल याचे उत्तर येणारा काळच देईल.

दैनिक
# राज्य लोकतंत्र


# बाभळगावच्या उपसरपंचांचा मृतदेह रस्त्यावर; दुचाकीचा चुराडा

## व्यायामासाठी निघालेल्या तरुणांना दिसला रक्ताने माखलेला मृतदेह, उपसरपंच वैजनाथ लाटे यांच्या अचानक निधनाने शोककळा



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील श्रीक्षेत्र बाभळगाव येथील विद्यमान उपसरपंच वैजनाथ विठ्ठल लाटे यांचा मृतदेह दि २६ ऑगस्ट बुधवार रोजी पहाटे भोपा ते बाभळगाव रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात माखलेला आढळून आल्याने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. घटनास्थळी त्यांची दुचाकी पूर्णपणे चक्काचूर झालेल्या अवस्थेत सापडली असून, प्राथमिक माहितीनुसार हा भीषण रस्ता अपघात असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. मात्र,घातपात की अपघात,याचे नेमके सत्य शवविच्छेदन अहवाल आणि पोलिसांच्या सखोल तपासानंतरच समोर येणार आहे.उपसरपंच लाटे यांचा मृतदेह पहाटे व्यायामासाठी गेलेल्या तरुणांच्या निदर्शनास आला.

यासंदर्भात पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उपसरपंच वैजनाथ लाटे हे दि २५ ऑगस्ट मंगळवार रोजी रात्रीच्या सुमारास आपल्या मोटारसायकलवरून भोपा–बाभळगाव रस्त्याने जात होते. या प्रवासादरम्यान अज्ञात कारणाने हा भीषण अपघात घडला असावा.दि २६ ऑगस्ट बुधवार रोजी पहाटे नेहमीप्रमाणे

### घातपात की अपघात?

व्यायामासाठी बाहेर पडलेल्या काही स्थानिक तरुणांना रस्त्याच्या कडेला लाटे यांचा मृतदेह रक्ताळलेल्या अवस्थेत पडलेला दिसला.जवळच त्यांची मोटारसायकल अपघातात चक्काचूर झालेली आढळून आली. तरुणांनी तात्काळ याची माहिती गावकरी आणि पोलिसांना दिली. दिंद्रुड पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होत मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह माजलगावला रवाना केला

घटनेची गंभीर दखल घेत दिंद्रुड पोलीस ठाण्याचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक कल्याण नेहरकर यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेतली.पोलिसांनी घटनास्थळाचा रीतसर पंचनामा करून पंचक्रोशीतील नागरिकांची गर्दी पांगवली.त्यानंतर मृतदेह ताब्यात घेऊन पुढील उत्तरीय तपासणीसाठी (शवविच्छेदन) माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.''

**बाभळगाववर शोककळा; पोलिसांकडून तपास सुरू**


वैजनाथ लाटे हे ग्रामपंचायत व सामाजिक कारभारात नेहमी आघाडीवर असणारे सक्रिय नेतृत्व होते. त्यांच्या अकाली आणि संशयास्पद मृत्यूची वार्ता पसरताच नातेवाईक, ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी घटनास्थळी आणि रुग्णालयाबाहेर मोठी गर्दी केली होती. दिंद्रुड पोलीस घटनास्थळावरील वाहनाचे नुकसान, वाहनाच्या धडकेचे व्रण आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास करत असून हा केवळ अपघात आहे की घातपात, या दिशेनेही पडताळणी केली जात आहे.''

## शॉर्ट सर्किटमुळे दोन एकर ऊस जळून खाक; महातपुरी शिवारातील शेतकऱ्याचे मोठे नुकसान

माजलगांव । प्रतिनिधी

तालुक्यातील महातपुरी शिवारात दि २५ ऑगस्ट मंगळवार रोजी सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारासशॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत शेतकरी आश्रुबा लोखंडे यांच्या शेतातील दोन एकर उभा ऊस जळून खाक झाला.या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, वर्षभर मेहनत करून जोपासलेला ऊस डोळ्यादेखत जळाल्याने शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार तालुक्यातील महातपुरी शिवारातील शेतकरी आश्रुबा लोखंडे यांच्या शेतातील उसाला शॅटसर्किटमुळे दि २५ ऑगस्ट मंगळवार रोजी सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारास शेतातील विद्युत वाहिनीमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने उसाच्या शेताला अचानक आग लागली.काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने दोन एकर क्षेत्रातील उभा ऊस पूर्णपणे जळून खाक झाला.आगीची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.या आगीत शेतकरी आश्रुबा लोखंडे यांच्या ऊस पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे महावितरण कंपनीने तातडीने घटनास्थळी पाहणी करून शॉर्ट सर्किटचे नेमके कारण स्पष्ट करावे,तसेच प्रशासनाने पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला योग्य ती ◀◀ पान ३ वर



## आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून रुग्णांना मोठा दिलासा; वैद्यकीय उपचारांसाठी १ लाख ९९ हजारांची मदत व सवलत

आष्टी । प्रतिनिधी

लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांच्या माध्यमातून मतदारसंघातील गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी सातत्याने मदत मिळवून दिली जात आहे. त्याच अनुषंगाने खडकत (ता. आष्टी) येथील अडीच वर्षांची चिमुकली ओजस्वी किशोर पवार हिच्या पुणे येथील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमधील उपचारासाठी धर्मादाय योजनेअंतर्गत ६९ हजार रुपयांची बिलात सवलत मिळवून देण्यात आली आहे.

ओजस्वी हिच्यावर दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. डिस्चार्जच्या वेळी तिचे एकूण बिल १ लाख ३८ हजार रुपये झाले होते. धर्मादाय योजनेअंतर्गत त्यापैकी ५० टक्के म्हणजेच ६९ हजार रुपयांची रक्कम माफ करण्यात आली. ही सवलत मिळवून देण्यासाठी रुग्णसेवक अमर वाळके यांनी आ. सुरेश अण्णा धस यांच्या कार्यालयाच्या माध्यमातून पाठपुरावा केला.

दरम्यान, घाटा पिंपरी (ता. आष्टी) येथील वेदांत आमटे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी मुख्यमंत्री सहायता निधी योजनेतून ८० हजार रुपये, तर तवलवाडी (ता. आष्टी) येथील दत्ता आठरे यांच्या उपचारांसाठी ५० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

या तिन्ही प्रकरणांमध्ये मिळून रुग्णांना १ लाख ९९ हजार रुपयांची आर्थिक मदत व वैद्यकीय बिलात सवलत मिळाली आहे. आर्थिक अडचणींच्या काळात उपचारासाठी मिळालेल्या या मदतीमुळे संबंधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत आणि आर्थिक अडचणींमुळे उपचारांमध्ये अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी आ. सुरेश अण्णा धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधी, धर्मादाय योजना तसेच विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे.

## ग्रामपंचायत अधिकारी संगीता माने यांचा जिल्हास्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने सन्मान




बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सोनेगाव-सौंदाणा व तळे पिंपळगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामपंचायत अधिकारी सौ. संगीता माने यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत जिल्हास्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या विकासासाठी केलेले उल्लेखनीय कार्य, प्रशासनातील प्रभावी योगदान आणि जबाबदारीने केलेल्या कामाची दखल घेत संगीता माने यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

जिल्हास्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ. संगीता माने यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, ग्रामस्थ तसेच सहकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.



## ऊस जळीतप्रश्नी आठ लाख रुपये नुकसान भरपाई द्या –भाई ॲड.नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील महातपुरी येथे अश्रुबा लोखंडे या शेतकऱ्याच्या शेतातील तब्बल साडेतीन एकर उभा ऊस एम एस ई बी च्या निष्काळजीपणामुळे विद्युत तार तुटून आग लागून जळून खाक झाला आहे..

घटनेची माहिती मिळताच शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी घटनास्थळावर जाऊन शेतकऱ्याच्या झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीबाबत संबंधित अधिकाऱ्यांना ◀◀ पान ३ वर

## मंगळवारी झालेल्या पावसाने पिकांना मिळाले जीवदान; शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगावसह परिसरात काल रात्री झालेल्या दमदार पावसाने पावसाअभावी सुकत चाललेल्या खरीप पिकांना मोठा दिलासा मिळाला असून पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. या पावसामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने फुलोऱ्यात आलेले सोयाबीन तसेच इतर खरीप पिके सुकू लागली होती. हातातोंडाशी आलेला घास पावसाअभावी हिरावला जातो की काय, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत होती. काही ठिकाणी दुबार पेरणीचे संकटही निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत वरुणराजाने ऐन वेळी दमदार हजेरी लावत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला. रात्री झालेल्या पावसामुळे शेतशिवारात चांगला ओलावा निर्माण झाला असून सुकत चाललेल्या पिकांना पुन्हा नव्याने जीवदान मिळाले आहे. त्यामुळे ◀◀ पान ३ वर

## पिंपळवंडीच्या उमैर शेखची राज्यात द्वितीय क्रमांकाची झेप; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव

पिंपळवंडी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत पिंपळवंडी येथील उमैर मुख्तार शेख याने इयत्ता चौथीच्या परीक्षेत राज्यात संयुक्तपणे द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. त्याच्या या दमदार कामगिरीमुळे पिंपळवंडीच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



वसुंधरा प्राथमिक विद्यालयातील तब्बल १२३ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी ८० विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले, तर २८ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. विद्यालयाच्या श्रुती संतोष पोकळे हिने राज्यात प्रथम क्रमांक, तर आदिनाथ प्रदीप सांगळे आणि उमैर मुख्तार शेख यांनी संयुक्तपणे द्वितीय क्रमांक पटकावला.गुणवंत विद्यार्थ्यांच्या या यशाचा गौरव २४ ऑगस्ट रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात आयोजित कार्यक्रमात करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उमैरसह गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी आमदार सुरेश (आण्णा) धस यांचे विशेष सहकार्य लाभले.यावेळी वसुंधरा प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष मनोज धस, मार्गदर्शक गणेश हिंगणे आणि रोहिणी ढगे यांची उपस्थिती होती. ◀◀ पान ३ वर


## बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करा

### १६ सप्टेंबरला बैलगाडी मोर्चाचा इशारा : भाई थावरे



माजलगाव । प्रतिनिधी

जिल्ह्यातील खरीप हंगामातील कापूस आणि सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून ऊस पिकाचीही अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. यामुळे बीड जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी नेते थावरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. नसता १६ सप्टेंबर रोजी माजलगाव तहसील कार्यालयावर बैलगाडी मोर्चा काढण्याचा इशारा थावरे यांनी दिला आहे.



निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी पीककर्ज काढून खरीप पिकांसाठी मोठा खर्च केला. मात्र, पिके हातातून गेल्याने हंगामाच्या अखेरीस शेतकऱ्यांच्या पदरात काहीही पडण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी थावरे यांनी केली आहे. २०२५-२६ या वर्षाचा पीकविमा अद्याप अनेक शेतकऱ्यांना मिळालेला नाही. ◀◀ पान ३ वर

## नवनाथ बाबाच्या रूपाने नवनारायणाचे दर्शन होते - ह.भ.प.विशाल महाराज खोले

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील ब्रह्मयोगी महान संत ह.भ.प.वै.किसन बाबा महाराज यांच्या त्यागातून व कृपाशीर्वादातून श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे वैभव दिसत आहे. शांतीब्रह्म नावाप्रमाणे सदैवस्थित प्रज्ञा असणारे व भगवंताच्या नामामध्ये लीन असणारे स्थितप्रज्ञ असे शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्याकडे पाहिलं की गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबाच्या रूपाने नवनारायणाचे दर्शन घडतं असे महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार ह.भ.प.विशाल महाराज खोले म्हणाले

वारकरी संप्रदाय हा नाथ परंपरेतून निर्माण आलेला आहे.संत ज्ञानेश्वर यांच्या आजोबाना गोरक्षनाथांनी समाधी दिली व गहिनीनाथांनी निवृत्तीनाथांना दीक्षा दिली यातूनच वारकरी संप्रदायाचा पाया रचला गेला.नाथ संप्रदायाचे वारकरी संप्रदायावर अनंत उपकार आणि संस्कार आहेत. नवनाथांनी जे त्यागातून जनकल्याणाच काम केलं त्याचा वारसा पुढे वारकरी संप्रदायातून संत मंडळींनी चालवला असे खोले महाराज म्हणाले.



**श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे हरिकीर्तनास प्रचंड गर्दी**

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंगाचे विवेचन करताना खोले महाराज पुढे म्हणाले की मनुष्य आयुष्यात लहान असताना आई समोर नाचतो, तरुणपणी मायामोहाने पत्नी समोर नाचतो आणि म्हातारपणी मुलांसमोरून नाचत असतो तरुणाने आयुष्यामध्ये पत्नीच्या ,मुलाच्या तालावर नाचण्या ऐवजी मनुष्याने परमात्म्याच्या नामस्मरणात नाचावे त्यामुळे आयुष्याचे कल्याण होतं.

मनुष्याने हरिनामात हरिकीर्तनात, वारीमध्ये, पांडुरंगाच्या दारामध्ये, साधुसंतांच्या सानिध्यामध्ये, हरिपाठ मध्ये,हरिनामात दंग होऊन नाचावे परंतु मनुष्याच्या जीवनाची विडंबना अशी आहे की मनुष्य बायकोच्या तालावरनाचतो,मनुष्य दारू पिऊन नाचतो,मनुष्य नेत्याच्या तालावर ◀◀ पान ३ वर

## केज शहरात ईद-ए-मिलादुन्नबी उत्साहात साजरी; हिंदू-मुसलिम ऐक्याचे घडले दर्शन

केज । प्रतिनिधी

इस्लाम धर्मगुरू हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मोत्सव निमित्ताने केज शहरात 'ईद-ए-मिलादुन्नबी' अत्यंत उत्साहात, चैतन्यपूर्ण वातावरणात आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या संदेशासह साजरी करण्यात आली. उर्दू कॅलेंडरनुसार १२ रब्बी उल अव्वल या पवित्र दिवशी जगभरात हा सण साजरा केला जातो, याच अनुषंगाने केज शहरातही विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.जुलूस आणि मिरवणुकीचा मार्ग ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त शहरात काढण्यात आलेल्या भव्य जुलूसची सुरुवात हजरत ख्वाजा मोहजेबोद्दीन दर्गा येथून झाली. हा



जुलूस केज शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आला:प्रमुख मार्ग: दर्गा परिसर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक शहरातील विविध प्रमुख मोहल्ले व मार्ग.समारोप: हा पवित्र जुलूस विविध मार्गांवरून मार्गक्रमण करत पुन्हा दर्गा हजरत ख्वाजा मोहजेबोद्दीन येथे पोहोचला. तिथे विशेष प्रार्थना (दुआ) आणि पठाण करून मिरवणुकीची शांततापूर्ण सांगता करण्यात आली.

सामाजिक सलोखा आणि ऐक्याचे प्रतीक ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26